# लोकार्थ

प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे

प्रकाशन मंच

प्रकाशक
चॅरिटेबल ट्रस्ट, अहमदनगर
महाराष्ट्र, भारत

**लोकार्थ**
**(Lokarth) (Free Thinking)**
प्राचार्य डॉ. अनिल सहस्रबुद्धे

© उषा सहस्रबुद्धे

**प्रकाशक**
आनंदोत्सव प्रकाशन मंच
आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट
'आई', समर्थनगर, श्रीराम चौक, पाईपलाईन रोड
अहमदनगर, महाराष्ट्र, भारत. ४१४००३
फोन : (०२४१) २४२४१६७

ISBN.13 978-93-84887-26-1
प्रथम आवृत्ती आषाढी एकादशी २०१७

**टाईपसेटींग–लेआऊट**
कुलकर्णी टाईपसेटर्स, अहमदनगर ९८५०२३२८९०

**मुद्रक**
मळगंगा ऑफसेट, अहमदनगर

विशेष निवेदन : 'आनंदोत्सव'प्रकाशन मंच केवळ, प्रकाशनार्थ मंच, विनामूल्य सेवा उपलब्ध करून देतो. ग्रंथनिर्मिती, वितरण, आयव्यय याशी आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टचा कोणताही, कोणत्याही प्रकारे संबंध नाही.
सदर ग्रंथ निर्मितीचा संपूर्ण खर्च भाविकांनी केला आहे. लेखकाने ग्रंथ विक्रीतून उत्पन्न मिळाल्यास ते सेवाभावी संस्थांना देणगी सहाय्य देण्याचा संकल्प केला आहे.
या पुस्तकातील मतांशी प्रकाशन मंच सहमत असेलच असे नाही.

मूल्य :– ५०/–



## लोकार्थ साधकांस

**अनिल सहस्रबुद्धे**

# गुज

राम राम मंडळी.

'लोकार्थ' हे छोटेसे पुस्तक आपल्या शहाणपण असणारांच्या हाती देतांना आनंद वाटतो. 'जे जे आपणाशी ठावे, ते ते इतरांशी सांगावे, शहाणे करूनी सोडावे, सकलजन', हे पांडुरंगाचा वेध लागलेलेच करू शकतात.

प्रत्येकाच्या जगण्यात राम असला पाहिजे असे वाटत असेल तर लोकार्थ साधना हा स्वभाव झाला पाहिजे. त्याचसाठी आपणाशी हा मुक्त संवाद!

ह.भ.प. अशोकानंद महाराज कर्डिले हे पांडुरंग मार्गावरील एक साधक. आमचे सुहृद. त्यांचे 'दिंडी' हे त्रैमासिक. एखादा लोकहितैशी विषय घेऊन त्यावर चिंतन घडवावे हा या त्रैमासिकाचा लोकार्थ विचार. त्यास अनुसरून 'पुरुषार्थ चतुष्टय' हा विषय डोळ्यासमोर ठेवून त्यांनी एक वर्ष हे चिंतन घडविले. त्यात मी लिहावे असा सतत आग्रह. त्यातून हे लेखन घडले. त्याचे हे छोटेसे पुस्तक...

याचे सर्व श्रेय आपणा सर्वांना...

**– अनिल सहस्रबुद्धे**

●●●

# अनुक्रम


- रामार्थ ०५
- धर्म, सर्वधर्म समभाव आणि धर्मनिरपेक्षता ११
- अर्थ एव प्रधानः ! २३
- लैंगिक उन्माद म्हणजे काम पुरुषार्थ नव्हे २९
- 'मोक्षसाधना' हा मूलाधिकार ३५




# रामार्थ

भारतीय परंपरेने लोकच्या वर्तनात्मक संवेद्य अस्तित्वाला 'पुरुष' अशी संज्ञा दिली आहे. परमेश्वराच्या अनंत व्यापक अस्तित्वरूपाला 'विराट–पुरुष' असे म्हटले आहे. श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील भगवंताचे विश्वरुपदर्शन 'विराटपुरुषरुप' या स्वरूपात ओळखले गेले आहे. हे लिहिण्याचे कारण असे की, 'पुरुष' हा शब्द; व्यक्तीच्या आणि समष्टीच्या परस्पर संबंधातील वर्तनात्मक शक्तीमत्वाचे आणि समावेशक सहृदयी कर्तृत्वसंपन्न व कर्तव्यतत्पर कर्मपरतेचे वर्णन करणारा शब्द आहे. म्हणजेच 'पुरुष' हा शब्द 'लोक' असणे दर्शवतो तर पुरुष+अर्थ अर्थात पुरुषार्थ त्याच्या लोकमधील कर्मपरतेचे वर्णन करतो. पुरुष म्हणजे लोकचे असणे याचा सरळ अर्थ व्यक्तिमत्त्वाचे असणे होय. व्यक्तिमत्त्व यात व्यक्ती म्हणजे शरीर देह अथवा पंचतत्त्वात्मक भौतिक अस्तित्व तर त्या मत्त्व हा प्रत्यय चेतनेचे द्योतक आहे. जड+चेतन एकत्र आल्याशिवाय व्यक्तिमत्त्व प्रकट होत नाही. या व्यक्तिमत्त्वाचे लोक मधील वर्तनात्मक दर्शन म्हणजे पुरुषार्थ होय. चेतनेशिवाय जडाचे चलन शक्य नाही. म्हणजे चैतन्य हा त्या जडावर अधिराज्य गाजविणारा क्षेत्रज्ञ आहे; तर जड हे त्याचे क्षेत्र आहे. हे जड शरीर पंचतत्त्वात्मक समग्र क्षेत्राचा अंशात्मक असा एकत्रित विनियोग आहे. चैतन्य हा परमात्मा अर्थात पंचतत्त्वांचा कर्ता, जनिता आणि भोक्ताही आहे; तरीदेखील तो त्या जडाहून अलिप्त आहे. त्याचे हे अलिप्तपणच

त्याला व्यक्तिमत्त्वाच्या कर्मपरतेत अपेक्षित असते. याकरिताच निष्काम कर्मपरतेची मांडणी केली आहे. या विवेचनाचा संक्षेपाने तात्त्विक अर्थ असा की, पुरुषार्थ म्हणजे व्यक्तिमत्त्वाचे अर्थात पुरुषाचे निष्काम कर्म होय. या अलिप्ततेमुळेच व्यक्तिमत्त्वाच्या पृथकअस्तित्वाचे विराटस्वरूपात विलय किंवा त्या पृथक अस्तित्वाचे विराटस्वरूपरूप होणे म्हणजे सर्वश्रेष्ठ पुरुषार्थ होय. प्रत्येक देहाला पुरुषार्थाचे पालन करण्याचा अपरिहार्य, अनिवार्य असा उपजत अधिकार आहे.

सर्वप्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की, पुरुष हा शब्द व्यवहारात लिंगभेदासाठी वापरला जातो. तो त्याचा अतिसंकुचित अर्थ आहे. म्हणूनच पुरुषार्थ म्हणजे पुरुषीपणा नव्हे! पुरुषार्थ ही कल्पना लिंगभेदात्मक पुरुष आणि स्त्रीसाठी सारख्याच न्यायाने सांस्कृतिक प्रवाहात उपयोजिली आहे. म्हणून पुरुषार्थ म्हणजे 'लोकार्थ' होय. भारतीय लोकपरंपरेत वेदपूर्वकाळापासूनच शुद्ध विचार, शुद्ध आचार आणि शुद्ध वाणी यांची जाण, आवड आणि परंपरा, वृक्ष-वेली, झाडे-झुडपे, पशु-पक्षी, पर्वतप्रपात डोंगर-दऱ्या, जलप्रवाह, सूर्य, चंद्र, तारे यांच्या अनुभूतीमधून विकसित झाली. किंबहुना या लोकसारणीने धारणापरंपरांना दैवत निर्मिती, सहानुभूती, भूतदया आणि मानवी लोकसंग्रहांच्या माध्यमातून आकार दिले. एकप्रकारे प्रकृति आणि लोक किंवा पुरुष यांची एकात्मता साधण्याची ही प्रक्रिया होती. यातूनच नीतीतत्त्वे, कर्तव्ये, न्याय आणि सर्वात्मक सामाजिक व्यवहार यांचा जन्म झाला. या प्रक्रियेचेच प्रक्षेप ऋषींनी मांडणी केलेल्या वैदिक सारणी किंवा सनातन धर्मपरंपरेत दिसतात. वैदिक परंपरा या लोकजीवनाच्या वरील प्रक्रियेतून चुकत शिकत, संशोधित स्वरूपात ऋषींनी मांडल्या. यातून परंपराप्राप्त सारणीला वैदिक संस्कृती असे आपण म्हणतो. या वैदिक संस्कृतीनेही विचार, आचार आणि वाणी यांच्यासह मनोविकारांवर नियंत्रण ठेवून व्यवहार करण्यावर भर दिला. त्यातून आदर्शभूत वर्तनाचरणाचा आराखडा तयार झाला. हाच लोकार्थाचा अर्थात पुरुषार्थाचा आराखडा होय. जीवन सर्वात्मकतेने, समावेशकतेने, सत्यनिष्ठेने करुणापूर्वक सिद्ध होण्याची प्रेममयसारखी म्हणजे हा लोकार्थ किंवा पुरुषार्थ चतुष्ट्य होय!



हे चार पुरुषार्थ म्हणजे (१) नाती पूर्ण वर्तन अर्थात जगा आणि जगू द्या यासाठी प्रेमपूर्वक सकारात्मक नियमित अर्थात बंधनमूलक; म्हणजेच त्यागपूर्ण वर्तन; ज्याला परंपरेने 'धर्म' असे नाव दिले आहे त्याचे पालन होय. (२) जगण्यासाठी माणसाला अन्न, वस्त्र, निवारा आणि लोकसंग्रह यांची आवश्यकता असते. व्यावहारिक जीवनात साधनांशिवाय या गोष्टी माणसाला प्राप्त होत नाहीत, या सर्वगोष्टी नुसत्या मिळतील तशा त्याला स्वीकाराव्या लागतातच; तथापि त्या मनोवृत्तींना आनंदादयक अशा त्याला हव्या असतात, त्यासाठी त्याचा संघर्ष असतो. या संघर्षात देवाणघेवाण अर्थात विनिमय व्यवहार अतिमहत्त्वाचा असतो. ही देवाणघेवाण करण्यासाठी विनिमयाचे साधन म्हणून ज्या ज्या म्हणून गोष्टी वापरता येतात, त्या सर्व गोष्टींना माणसाने 'धन' किंवा 'अर्थ' अर्थात पैसा असे नाव दिले आहे. हे धन प्रतिकात्मक म्हणजे मुद्रांच्या स्वरूपात असते किंवा मौल्यवान धातू वा वस्तुंच्या स्वरूपात असते. जसे सोने, चांदी यांसारखे मौल्यवान धातू, रत्ने, मोत्ये, सुगंधी किंवा मौल्यवान असे दगड, माती, लाकूड या स्वरूपातील पदार्थ; किंवा जमीनजुमला, शेतीभाती, स्थावर स्वरूपातील घरेदारे, गडकोट किल्ले इ. स्वरूपातील गोष्टींच्या स्वरूपात असते. तसेच ते जनावरे, माणसे यांसारख्या प्राणीस्वरूपातही असते. एवढेच नव्हे तर भाषा, भावना, नातेसंबंध याही स्वरूपात असते. हे सर्व धन जोडावे लागते म्हणजेच मिळवावे व सांभाळावे लागते. त्यासाठी श्रम, कष्ट, परिश्रम, व्यवहार, तडजोड यांसह देवाणघेवाण करावी लागते. देवाणघेवाणीतून धन आणि धनसाधनातून देवाणघेवाण करावी लागते. देवाणघेवाणीतून धन आणि धनसाधनातून देवाणघेवाण असा हा व्यवहार असतो. यात समृद्धी आणि सहानुभूतीपूर्वक, सुखदायकता यांची अपेक्षा असते. त्यासाठी व्यवहार करावा लागतो. हा व्यवहार प्राप्तीसाठी असला तरीही प्राप्ती शोषणमुक्त आणि सर्वसुखाय करावी अशी नैतिक मूल्यभावना या धनप्राप्ती नावाच्या लोकार्थात असते. म्हणूनच व्यवहाराचे अर्थात इहलोकीचे जीवन संपन्न करण्याचे साधन म्हणजे 'अर्थ' हा दुसरा लोकार्थ भारतीय परंपरेने मानला आहे. (३) 'काम' हा जीवनातील सर्व इच्छा,

आकांक्षा, यांची पूर्ती जीवन जगण्यात व्हावी या साठीचे अपरिहार्य कर्म विचारात घेऊन घडणारी धडपड ह्यांत अपेक्षित असते. भूक आणि प्रज्योत्पादन किंवा संभोग या उपजत प्राणीप्रवृत्तींशी 'काम' पुरुषार्थ जोडला आहे. वासनातृप्ती किंवा भावनापूर्ती असेही या भावनिक चेतनेचे अस्तित्व असते. या पूर्ततेत प्राणीपातळीवरील प्रवृत्ती निसर्गतः उफाळून येत असतात. कधी तर त्या अनिवार होतात. पिसाट, सैराट मनाने पूर्ती करण्याकडे प्राणीमात्र झेपावतो. यास माणसाचा अपवाद कसा असेल? म्हणूनच 'कामप्रवृत्ती' ही मानवी जीवनात सर्वाधिक संघर्षकारक, उन्मादकारक आहे. येथे माणसातले माणूसपण हरवून जाण्याची शक्यताच अधिक असते. असे हरवणे हा 'काम' पुरुषार्थ नव्हे तर संयमपूर्ण जीवन जगून सर्व इच्छांची पूर्ती करणे म्हणजे 'काम' हा लोकार्थ सिद्ध करणे होय. आणि (४) 'मोक्ष' हा पुरुषार्थ साधणे म्हणजे मानवी जीवनातच संपूर्ण अस्तित्वाचे कारण परमतत्त्व शोधून समजावून घेऊन तत्तसम 'सम' दृष्टीने व्यवहार करणे होय. त्यासाठी ऐहिक व पारलौकिक जीवनाचा समन्वय साधणे म्हणजे माणसात माणूसपण प्रकटवून परमेश्वरी वर्तन करणे होय!

लोकार्थ अर्थात ज्या कर्मपर अवस्थांचे वर्णन पुरुषार्थ म्हणून सनातन संस्कृतीत केले आहे; त्या अवस्था ह्या धर्मदंडांनी घातलेली बंधने किंवा विशिष्ट कर्मठस्वरूपातील कायदे नव्हेत. त्या अवस्थांना मानवी सत्य, प्रेम, करुणेचा नैतिक आधार आहे. ती नैतिक कर्तव्ये आहेत. या कर्तव्यांनाच लोकजीवनातील अर्थ किंवा राम असे म्हटले आहे. ही कर्तव्ये अवलंबिली नसतील तर वर्तनप्रणालीत काही 'राम' नाही असे अगदी सहज म्हटले आहे. जीवनात राम असणे म्हणजे लोकार्थ तत्परतेने पालन करणे होय. 'राम' भावना म्हणजे सर्वाभूती समर्पित अशी निष्काम कर्मभावना होय. याच भावनेने भारतीय परंपरेने रामांना पुरुषोत्तम म्हटले तर श्रीकृष्णांना योगेश्वर कृष्ण असे म्हटले आहे. सर्वाभूती परमेश्वर असल्याची जाणीव झाली की मग कर्म आणि अहंकार यांचा संबंध आपोआपच गळून पडतो आणि उरते ते प्राप्त कर्मकर्तव्यता. ती प्राप्तकर्मकर्तव्यता म्हणजे इहजीवनातील अपरिहार्यता नव्हे तर त्या परतत्त्वाचा विलास होय. हे



एकदा समजले की कर्माला कर्तृत्वाचा अर्थ प्राप्त होतो आणि कर्तृत्वाला व्यापक धारणाशक्तीचे बळ मिळते. लोकजीवनात माता, पिता, बंधु, पुत्र, पत्नी, भगिनी, गुरू लोकधुरीण, राजा, पोशिंदा, नायक अशा एक ना अनेक प्रकारे भूमिका स्वीकारून लोकधारणा अधिक जीवट आणि सुखदायकपणे कशी वठविता येईल; याचा विचार म्हणजे प्राप्त कर्तव्यभावना होय. शोषक होऊन भूमिका बजावणे म्हणजे लोकार्थच्यूततेने पशूवत किंवा दानवी अहंकाराने स्वतःसाठी जगणे होय. या जगण्यात 'राम' नाही. तसेच दुर्बल, हतबल मनाने शोषित होऊन प्राप्त शोषणाला शरण जाऊन अज्ञान, दास्य आणि लाचारीत जगणे यातही 'राम' नाही. तर सर्वात्मक होऊन; सत्य, प्रेम, करुणा यांसह सहानुभूतीपूर्वक कर्तव्यतत्पर राहण्यात राम आहे. येथेच पुरुषार्थ चतुष्टयातील 'राम' आहे. हे लक्षात घेऊन लोकजीवनातील प्रवास केला पाहिजे. जीवनातील ह्या 'रामा'चा शोध घेऊन जाणीवपूर्वक 'राम' निर्माण केला पाहिजे तरच लोकार्थाची सार्थकता.

सनातन लोकसारणीतील 'राम' स्वरूप लोकार्थ किंवा पुरुषार्थ चतुष्टय साधण्यासाठी स्मृतिग्रंथात अनेक नीतीनियम मांडलेले दिसतात. अनेकदा स्मृतिग्रंथांना पोथीनिष्ठेने धर्मग्रंथ म्हणून मानले जाते. धर्मवेत्ते, सनातनी, कर्मठ स्मृतिग्रंथांतील अशा नीतीनियमांना लोकार्थ चतुष्टय साधनेतील कायदे किंवा न्याय दंड मानतात. हे सर्वथा चूक आहे असे नाही तर ते अर्धसत्य आहे. स्मृतिग्रंथांत स्थलकाल परिस्थितीनुरुप लोकपरंपरेला शिस्त लावण्याचे प्रयत्न प्रथांच्या स्वरूपात पाचामुखी पंचायतीतून धर्मदंडांच्या स्वरूपात झालेले असते. लोकधुरीणांनी बहुजनसुखार्थ केलेला तो तात्कालिक व्यवस्थापनात्मक खटाटोप असतो. म्हणूनच स्मृतिग्रंथांचे काळानुरुप आणि ऋषीकुलानिहाय वैविध्य व परिवर्तनात्मक स्वरूपातील आवृत्त्या दिसतात. अलीकडे राज्यघटनांचे जे स्वरूप तात्कालिक, लवचिक व परिवर्तनमूलक असलेले पाहावयास मिळते तेच स्मृतिग्रंथांचे असते. म्हणूनच त्यात सार्वत्रिक व सार्वकालिक सत्यसार्थता नसते. मात्र त्यातला विचार सत्य, प्रेम, करुणा यांसह भूतमात्रांची सर्वसुखात्मक जीवनधारणा हा 'राम'विचार सदैव केंद्रस्थानी व मूल्यात्मकतेने

प्रेरणा देत असतो. लोकार्थ चतुष्टय म्हणजे स्मृतिग्रंथाचे कर्मठ पालन नव्हे तर 'समत्व' भावनेने 'राम' मूल्यात्मकतेने, कर्मतत्परतेने, कर्तव्यपरतेने करावयाची ती इहनिष्ठ साधना असते. या दृष्टीनेच लोकार्थ अर्थात पुरुषार्थ अर्थात 'राम' भावना यांचा विचार केला पाहिजे.

लोकरामार्थ विचाराचे आणखी एक व्यापक आणि सर्वसमावेशक मूल्य म्हणजे धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पायऱ्या किंवा चार अवस्था नाहीत; तर हे चारही लोकार्थ परंपराप्राप्त मानवी स्वभाव व्हावा असे लोकव्यवहारातील चलन असते. धर्मपालन, अर्थसाधना, कामसाधना व कामतृप्ती आणि मोक्षसाधना हे वर्तन चतुष्टय पृथक पृथक नाही तर मानवी व्यक्तिमत्त्वाचे हे चार 'विध' आहेत. असे चतुर्विध व्यक्तिमत्त्व प्रत्यही प्रकट व्हावे अशी सनातन भारतीय परंपरेची अपेक्षा तर आहेच परंतु समाजसारणीतून प्रत्येक व्यक्तिमत्त्वाचा तो स्वभाव होतो. म्हणजेच त्याच्या व्यक्तिमत्त्वात 'राम' किंवा 'अर्थ' प्रकटतो. तसे झाले नाही तर त्या व्यक्तीत काही 'राम' नाही असे लोकव्यवहारात मानले जाते. एवढे या चतुर्विध अर्थपूर्णतेचे व्यक्तिमत्त्वात महत्त्व आहे. तेच तर मानवी व्यक्तिमत्त्वाचे स्वत्व मूल्य आहे. 'राम'पण आहे. म्हणूनच या चार पुरुषार्थांचा आयुर्मान, वर्णाश्रम आणि लोकव्यवहार या सर्व संदर्भात अंतःस्त्रोतात्मक जाणिवेचा प्रवाह असणे अपेक्षित असते. हे लक्षात घेऊनच लोकरामार्थाची चर्चा धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष संदर्भात केली आहे.

●●●



# धर्म, सर्वधर्म समभाव आणि धर्मनिरपेक्षता

जागतिक पातळीवर, लोकसमुदायांच्या वर्तमानकालीन स्थितीगतीचा विचार केला तर, भौतिक विज्ञानाच्या माध्यमातून निर्माण केलेल्या साधनसामुग्रीचा, जीवनसारणीवर मोठा आणि अनिवार्य परिणाम झालेला दिसतो. बुद्धिप्रामाण्यवाद आणि विज्ञाननिष्ठा यामुळे जागतिक पातळीवरील लोकसमुदाय झपाट्याने जवळ येत आहेत. भूलोकीच्या मनुष्यमात्र आणि जीवमात्र यांचा जैविक समतेच्या आधाराने मानवी हक्क आणि कर्तव्यांचा विचार केला जातो आहे. राजशकट, न्याय, आरोग्य, पर्यावरण, साधनसुविधा, कायदा आणि सुव्यवस्था यांचा मानवाच्या जागतिक पातळीवर आणि वंशनिरपेक्षतेने विचार केला जात आहे. ह्या धारणा वैश्विक मानवाच्या जीवनप्रणालींच्या तात्त्विक चैतन्यशाली अतिस्तत्व विचारांच्या, मूल महाकारण अस्तित्व तत्त्वापर्यंत घेऊन जाणाऱ्या आहेत. मनोविज्ञान, तत्त्वज्ञान आणि विज्ञान यांचा विश्वव्यापक सापेक्ष विचार करून मानवी अस्तित्वाचा शारीरिक, मानसिक आणि जीवनप्रणालीतील तात्त्विक वर्तनपद्धतींचा सर्वांगीण विकास आणि समन्वय राखण्याचा हा प्रयत्न, अतिप्राचीन ऋषीकुलांतील ज्ञानसाधना आणि ज्ञानाचा जीवनप्रणालीतील विनियोग याविषयीच्या केलेल्या प्रयत्नांसारखाच आहे.

**१.** मानव हा कळप करून राहणारा प्राणी. या दृष्टीने एक प्राणी आहे हे निर्विवाद सत्य आहे. उद्‌भिज, स्वेदज, अंडज आणि जारज या चतुर्विध जीवप्रणालीतील असंख्य प्रजातींपैकी एक प्रजाती आहे हेही

वास्तव आहे. तेवढेच वास्तव हे आहे की, स्वाभाविक अंतःप्रेरणा, बुद्धिजन्यता, सौंदर्यदृष्टी, प्रतिभाजन्यता यांसह अमानवी, मानवी, जीवमात्रात्मक आणि भौतिक अस्तित्वांना मानवी कल्याण आणि चिरंतनत्वाच्या दृष्टीने, कार्यकारणभावात्मक विचार प्रक्रिया वापरून नाविन्यपूर्णतेने व्यवस्थापित, पुनर्व्यवस्थापित; एवढेच नव्हे तर पंचभौतिक सृष्टीच्या, स्थलकाल परिस्थितीसापेक्ष पुन्हा पुन्हा पुनर्व्यवस्थापित करण्याचा, मानवाचा स्वाभाविक गुण (मानवाचा निसर्गतः गुण) आहे. हे त्याचे सर्व अस्तित्वांमधील वेगळेपण आहे. या मानवाच्या वेगळेपणातूनच त्याने विज्ञानाचादेखील ज्ञानात्मक पातळीवर स्वसंवेदनात्मकतेने अनुभव घेऊन जीवनप्रणालीमध्ये विनियोग करण्याचा प्रयोग केला. यातूनच त्याच्या (मानवाच्या) समूहधारणात्मक जीवनप्रणाली विधिनिषेधांचा जन्म राहिला आहे. स्थलकाल परिस्थितीसापेक्षतेने, त्याच्या नवनिर्माण, नवव्यवस्थापन प्रक्रियांसह त्याच्या जीवनप्रणालींमध्ये परिवर्तन प्रक्रियाही होत राहिली आहे. सृष्टीतील आणि अथांग विश्वातील नित्यता आणि अनित्यता यांचा, नित्य अनुभव घेण्याची उपजत क्षमता मानवाला प्राप्त आहे. या त्याच्या अंतःप्रेरणेनेच त्याला विश्वकारणाविषयी, नित्यता आणि अनित्यतेविषयी, आरंभापासूनच प्रश्न पडत राहिले आहेत. कारणाशिवाय कार्य घडत नाही, या त्याच्या नित्यानुभूतीमुळेच, मानवाने नित्यकारणाविषयीचा अनुभव भूतमात्रात, चराचरात घेतला. यातूनच मानवाच्या मनात मूलकारणाची दृढता निर्माण झाली. हे मूल कारण नित्य आणि सत्य आहे याचा विश्वास त्याच्या मनात दृढ झाला. या नित्यतत्त्वाचा अनुभव नित्य, निरपेक्ष आनंदमय असल्याची खात्री, त्याला नित्य जाणवत आहे. त्या नित्यतेची भौतिक साधनांद्वारा प्रतिती घेण्यासाठीची त्याची धडपड सुरू झाली. या नित्य आनंददायी महारिणाला केंद्रस्थानी ठेवून त्याची (मानवाची) स्वजीवनाचे आणि सामूहिक जीवनाचे, प्रणाली व्यवस्थापन या दृष्टीने विचारप्रक्रिया सुरू आहे. मानवी आयुर्मर्यादा, समूहजीवनातील सापेक्ष स्थान, समग्र सृष्टीजीवनातील सापेक्ष स्थान, जैविक प्राकृतिक विकारांचा सामूहिक जीवनसापेक्ष विचार, मर्यादिततेतून, अनित्यतेतून निसटून नित्य



अस्तित्वप्राप्तीची ओढ, याविषयीच्या विचारांचा अनुबंध त्याच्या (मानवाच्या) जीवनप्रणाली व्यवस्थापनेशी आहे. या माणसाने आरंभलेल्या व्यवस्थापन प्रक्रियेतून, माणसांना एकत्रित (सामूहिक) आणि पिढ्यानुपिढ्या (पारंपारिक) जास्तीत जास्त सर्वसमावेशक, समाधानकारक, सर्व सुरक्षित, जीवनप्रणाली बांधण्याचा प्रयत्न समूहधुरिणांनी केला आहे. या समूहसापेक्षतेच्या विचारानेच, मानवी एकलेपणाचा विधीनिरोध मर्यादांमध्ये अडकवून समूहसापेक्ष जीवन जगण्यास अनिवार्य केले आहे. या समूहजीवनाला प्रणाली शास्त्र, विधिनिषेध आणि नित्यकारण (अध्यात्म) विचारांचा आवश्यक असा अंकुश माणसाने निर्माण केला आहे. मानवी प्रकृतीचे संसस्कृतिकरण करताना या प्रणालींचे उपयोजन आपण (माणूस करीत आला आहे) न्याय, सौंदर्यभावना, जैविक विकार, अनुभवविश्व या सर्वांना प्रणालींच्या विधिनिषेधांचे प्रभाव स्वीकारावे लागले आहेत. प्रणालींचे दृढीकरण, प्रणालीकेंद्रित शास्त्रे, प्रणालीकेंद्रीत तत्त्वज्ञान, प्रणालीकेंद्रीत-इतिहास, राजकारण, न्याय, लोकव्यवहार हा भाग, विश्वास, श्रद्धा, जिव्हाळा, सहानुभूती, प्रेम यासारख्या गोष्टी, सौंदर्यभावना, कल्पना, प्रेरणा-अशी मनोवृत्ती या गोष्टी मानवी अनुभूती प्रक्रियेतून अंतःप्रेरिततेने उदित झाल्या आहेत, असे लक्षात येईल.

२. जीवनप्रणाली मानवी समूहजीवनाच्या आरंभबिंदूपासून अस्तित्वात आहेत, यात दुमत असण्याचे कारण नाही. प्रणाली म्हणजे सारणी आणि सारणी म्हणजे परंपरोद्भव पद्धती म्हटले की परंपरांची विधिनिषेधात्मक चाकोरी आली. भारतीय परंपरेमध्ये स्मृती म्हणून ज्यांचा उल्लेख आहे किंवा अलिकडील काळात राज्यघटना म्हणून ज्यांना उल्लेख येतो त्यांचा विचार करावा लागतो. लोकधारणांची स्थल-काल-परिस्थिती सापेक्ष परस्परावलंबी सामूहिक अवस्था या चाकोरी, वहिवाट, परंपरा, पद्धती, सारणी, प्रणाली, नामक गोष्टी विश्वास, श्रद्धा आणि समूह समावेशकता, यांच्या दृष्टीने अपरिहार्यतेने आवश्यक व अनिवार्य असल्याचेही लक्षात येते. अशा अनेकानेक जीवनप्रणाली मानवी जीवनाच्या इतिहासात सतत निर्माण होत आल्या आहेत. या सर्व प्रणालींचा महत्तम

साधारण विभाजक पाहिला तर नित्यमूलकारण केंद्रस्थानी असते. या नित्य चैतन्यमय कारणाला नावे कोणतीही असोत, ते कारण कोणीही बुद्धिप्रामाण्याच्या कसोटीवर भौतिक किंवा वस्तुनिष्ठ स्वरूपात सिद्धही केलेले नाही आणि आत्मिकदृष्ट्या किंवा जाणीव अनुभूती संवेदना या दृष्टीने कोणी, कोणत्याही काळी नाकारलेही नाही. तेच अस्तित्वाचे मूळ आणि सत्य रूप होय. तेच सर्व निर्मितीचे मूळ कारण होय. तेच सर्वत्र समत्वाने भरलेले असूनही ते पूर्णतः बंधमुक्त असे पूर्णत्व आहे हे कोणीही तत्त्ववेत्त्याने, वैज्ञानिकाने, धुरिणाने नाकारलेले नाही. मनुष्यमात्राच्या निसर्गतः प्राप्त, अंतःप्रेरणा आणि सहानुभूती यांचा अपरिहार्य अनुभूत असा परिपाक असतो. या नित्यकारणाला पूर्ण, शून्य, परब्रह्म, प्रभू, अल्लाह, तत्त्व, चित्, स्पिरीट, सोल, तेज, भगवत् अशी कोणतीही नावे असोत वा मिळोत, हे अस्तित्व मानवी जीवन प्रणालीमध्ये सामूहिक जीवन आणि त्यातील व्यक्तिगत जीवन जगण्याचा मुख्य नित्य आधार, अर्थात धारणा तत्त्व आहे हे कोणी नाकारत नाही. जिवंतपण अनुभूत होते ते या कारणामुळे याविषयीही दुमत नाही, आणि चराचरातील एकात्मभाव अनुभूत होतो तोही याच कारणाने. या कारणावरील विश्वास म्हणजे धार्मिकता किंवा अध्यात्मिकता अुवा सत्+संग होय. याविषयी दुमत होण्याचे कारण नाही. असे असूनही स्थल काल परिस्थिती प्राप्त समुहात्मक, अनित्य जीवनातील सुरक्षिततेसाठीचा जगण्याचा आधार म्हणून अनेक धारणासूत्रे, तत्त्वे, लोकधुरिणांकडून, प्रेषितांकडून, तत्त्वज्ञांकडून, विचारवंतांकडून, कल्पक व्यक्तींकडून वेळोवेळी मंडित केली जातात. यातूनच परंपरा निर्माण होतात. या परंपरांना प्रणालीसारणी, संस्कृती असे म्हटले जाते. ही धारणासूत्रे मुख्य धारणासूत्राशी अंततोगत्वा, अनुबंधित असतात. अशी असंख्य धारणासूत्रे, लोकबंधाच्या रूपाने लोकधारणा करण्याचे कार्य करीत असतात. या स्थलकालपरिस्थिती, लोकसमूहसापेक्ष लोकधारणा सूत्रांच्या सहाय्याने अर्थात लोकबंधांच्या सहाय्याने सहजपणे एकात्म मानवी समुदायाचे, अन्य एकात्म मानवी समुदायांपासून, भिन्नत्व अनुभवता येतेच. मात्र तात्त्विकदृष्ट्या, मूल महाकारणाच्या दृष्टीने वैश्विक



पातळीवर विविध समुदायातील एकात्म जीवनधारणांचा अनुभवही घेता येतो. असे भिन्नत्व आणि व्यापक एकात्मत्व या दोन्ही गोष्टी वैश्विक मानव कल्याणाच्या दृष्टीने आवश्यकच असतात. लोकधारणासूत्रे ही विधिनिषेध कल्पनांच्या स्वरूपाने लोकधारणेसाठी कार्यान्वित असतात. मानवी अस्तित्व अर्थात माणूसपण आणि मूळमहाकारण अनुभूती, हे गृहितक सर्वत्र एकच असते. त्यामुळे कितीही भिन्नभिन्न प्रणाली, त्या प्रणाली विधिनिषेध धारणेप्रमाणे, काटेकोर, कर्मठ, परंपरावादी असल्या तरी त्यात अपरिहार्यपणे परिवर्तन घडतच राहाते.

**३.** जगाच्या पाठीवर धर्म अर्थात रिलिजन या नावाने आज मुस्लिम, ख्रिश्चन, हिंदू असे ठळक तीन धर्म प्रचलित दिसतात. याशिवाय शीख, जैन, बुद्ध यासारखे काही विचारकोश धर्म म्हणून पुढे येतात, असंख्य पंथही धर्म म्हणवून घेतात. या सर्व धर्मांची स्वतंत्र अशी विधिनिषेधप्रणाली अनुभवता येते. सणोत्सव, देवदेवता, उपासनापद्धती व त्यासाठीचे मंत्रतंत्र, विधिनिषेध, सुखदुःखे व्यक्त करण्याच्या पद्धती, सामाजिक संबंधपद्धती, जन्मप्रथा, विवाहप्रथा, मर्तिकप्रथा, खाद्यप्रणाली, या गोष्टी संबंधातील या मार्गांमध्ये लोकबंध भिन्न असतात. मात्र या सर्व वर्तनपरंपरा साधन किंवा वस्तुपरंपरा आणि अनुषंगिक शाब्दपरंपरा किंवा भाषिकपरंपरा यांना ठरीव व संप्रदायानुबंधित अर्थ प्राप्त झालेले असले तरी त्यांचा केंद्रबिंदू मानवी कल्याण हाच असतो. राजकीय आणि आर्थिक व्यवहार, घरेदारे, रस्ते, उद्याने, मठमंदिरे, प्रार्थनास्थळे, न्यायप्रक्रिया, संरक्षण संकल्पना, वस्त्रेप्रावर्ण, सौंदर्य प्रकटीकरण साधने त्या त्या प्रणालीतील श्रद्धांशी जोडली जातात. ही श्रद्धा अंततोगत्वा त्या मूल कारणविषयक धारणारूपाशी निगडीत असते. एवढेच काय त्या मूलकारणाची प्राकृतिक वा व्यावहारिक संरक्षक शक्तीरूपे ज्या प्राकृतिक गोष्टीत, उदा.– डोंगर, वृक्ष, नद्या, सरोवरे, समुद्र, स्थाने, स्थले यांच्या असल्याची संवेदना प्रकटते. तेथे तेथे त्या महाकारणाचे अस्तित्व शक्तीस्वरूपात धारणातत्त्व बनून येते. लोकधुरीण, लोकनेते, दिव्यव्यक्तिमत्त्वे, अलौकिक प्रज्ञावंत, शक्तिमत्त्वे असलेले नेते, शास्त्रे विभूतिमत्त्वे त्या चैतन्यतत्त्वाची शक्तिरूपे

म्हणून पुढे येतात. मानवी जीवनाला जीवविण्यासाठी उपकारक ठरणाऱ्या सर्व गोष्टी जीवनसरणीत त्या महाकारणाची प्रतिनिधिक रूपे ठरतात. अशी देवदेवतांची असंख्य रूपे ही सर्व प्रणालीमध्ये मानसिक अनुभूतींच्या कसोटीवर सत्यच असतात. त्यामुळे लोकधारणा सूत्रांच्या स्वरूपात ती स्वीकारली जातात. त्यांच्याविषयीच्या उपकारक संवेदना पुण्यमय तर अपकारक संवेदना पापकारक ठरतात. त्यांच्याही परंपरा आपणास प्रणालीत आढळतात. लोकवर्तनात्मक जीवनसरणी अशा लोकबंधात्मक सूत्रांनी आकारदृढ झालेली असते. संघमनाच्या कसोटीवर या सर्व गोष्टी धर्म म्हणून अर्थात धर्मातील विधिनिषेधांच्या रूपात स्वीकारल्या जातात. आकाशातील आणि अवकाशातील दृश्य, अस्तित्वे, सूर्य, चंद्र आदि दिव्य ज्योती, डोंगर, दऱ्या, जमीन, शेती, नद्यानाले, सरोवरे, समुद्र, वायुलहरी, वृक्ष वेली, पूज्य व्यक्तिमत्त्वे (आई, वडील, गुरुजी इ.) या सर्वांना संघमानसाधारे दिव्यव्यक्तिमत्त्व, देवता रूपे म्हणून स्वीकारले जाते. त्यांचा समावेश मानवी जीवनातील सुखदुःखदायक गोष्टींची आधाररूपे म्हणून स्वीकृत होतो.

सृष्टीतील पंचमहातत्त्वे आणि मूलकारणाचे दिव्यत्व मानवी अस्तित्वामध्ये पाहण्याची नैसर्गिक प्रवृत्ती ही मानवी व्यक्ती आणि संघमनाची अनादि प्रवृत्ती आहे. अशी शक्तिमान मानवी अस्तित्वाने सिद्ध होऊ शकतात. याच्या अनुभूती स्वदेहाची शक्तीमत्त्वे विकसित करून शरीर वैज्ञानिक सत्यत्त्वाच्या कसोटीवर सृष्टीतील तत्त्वे शरीरात प्रकट करू शकतो. याचा अभ्यास माणसाने सर्वप्रथम केला आहे. माणसाच्या साधनविकासाच्या, वैज्ञानिकविकासाच्या इतिहासात सर्वप्रथम साधन म्हणून माणसाच्या हातात नैसर्गिकरित्या उपलब्ध होते, ते त्याचे शरीर आणि मन. ही दोन्ही साधने सृष्टी आणि मानव यांच्या अनुबंधित जीवनशैलीमध्ये माणसाला या साधनांचा दिव्य उपयोग झाला. म्हणूनच त्याने सर्व शक्तीमत्त्वांना मानवीरूपात आपले आराध्य म्हणून स्वीकारले आणि मनाच्या उत्कटत्वाने आणि अवगत वाणीशक्तीच्या योगाने शक्तींचे जागरण करता येते हे विज्ञान माणसास अवगत होण्यात माणसास आणि मानवी समूहास



यश आले. याच प्रक्रियेने मानवी जीवनप्रणालीत धुरीणांनी मानवी स्थैर्य आणि सुखरूपता यासाठी सर्व शक्तिमत्त्वांना त्या मूळ कारणाचे पार्षद, अवतार, स्वरूप अंश म्हणून स्वीकारले आणि मानवी प्रणालींमध्ये या सर्व दिव्य अनुभूतींना देवत्व बहाल झाले आणि त्यांना शरण जाण्याच्या परंपराही निर्माण झाल्या. या परंपरांना न जुमानता स्वतः त्यांच्या पातळीवर जाऊन शक्तिमत्त्व जागवून, शोषण करणाऱ्या प्रवृत्तींना दानवत्व प्राप्त झाले आणि देव, दानवांची युद्धे, मानव्याच्या इतिहासात, मानव्य रक्षणासाठी, कथात्मक सत्यांश घेऊन अवतीर्ण झाली. एकूण मानवी जीवनप्रणालीत संस्कृती, प्रकृती आणि विकृतीची प्रत्यक्ष मानवी रूपे अस्तित्वात आलेली पाहावयास मिळतात. तीही मानवास अवगत होत गेलेल्या शारीरविज्ञान, मनोविज्ञान आणि भौतिकविज्ञान यांच्या अभ्यासातून घडलेल्या उपयोजनाने होय.

४. नित्य आणि अनित्य यांच्यातील अविनाशित्वाच्या सबंधप्रक्रियेतून म्हणजे नित्य हे मूळकारण आणि अनित्य हे तात्कालिक कारण. ही तात्कालिकता नित्यातून भासमान होऊन नित्यातच विलयित होते. या अनुभूतीतून, उद्‌भव, वर्धन, लय, प्रलय या कल्पनानुभूती त्या विषयीच्या अविनाशित्व तत्त्वावर आधारित आहेत. वस्तुमात्रांच्या परिवर्तन प्रक्रिया, विज्ञानाच्या कसोटीवर अनुभवता येतात. वैज्ञानिक साधनांची गर्दी विस्मयकारकतेने तरी, नित्यत्वाच्या मर्यादेत प्रकट झालेली दिसते. तशाच अमानवी योनींचा अनुभव संघमाणसाने घेतलेला दिसतो. अशा अनुभूतीतून मानवी जीवनप्रणालींमध्ये विधिनिषेधांची घट्ट वीण दिव्य, अद्‌भूत आणि वास्तव अशा सर्व थरावर निर्माण झालेली दिसते. हे कोणा एका प्रणालीत नव्हे तर जगातील सर्व प्रणालीत अर्थात सर्व धर्मांमध्ये, पंथांमध्ये आढळते. मानवी जीवनप्रणालीतील व्यक्ती आणि समूहजीवनातील नातेसंबंध आणि सामाजिक सभ्यतेसह, भावनिक व व्यावहारिक अनुबंध यावर त्या नित्य आणि अनित्य कारणातील अविनाशित्व अनुभूतीचा खोलवर परिणाम झालेला दिसतो. पूर्वज परंपरा, वंशपरंपरा, जन्म पुनर्‌जन्मानुबंध, अमानवी प्रकारची मरणोत्तर अस्तित्वे, देवदेवतांचा मानवी

जीवनाशी आणि व्यवहाराशी अनुबंध यावर या तत्त्वांचा विधिनिषेध स्वरूपात प्रत्यक्ष वर्तनप्रणालीवर परिणाम झालेला दिसतो. यातूनच पाप, पुण्य, उपासनामार्ग, न्याय, उपन्याय, वरदान, कृपाप्रसाद याविषयीच्या विधिनिषेधात्मक परंपरा, रूढी, समजुती इ. निर्माण झाल्या आहेत. स्थलकाल परिस्थिती यांशी अनुबंधित, धुरिणांचे, दिव्य व्यक्तिमत्त्वांचे, महात्म्यांचे विचार यांच्या आधाराने प्रणालींची पृथकता आणि दृढता सिद्ध झाली आहे हे स्पष्टपणे लक्षात घेतले पाहिजे. यातून लोकाचार पद्धतींना आकार मिळाला, त्यांच्या परंपरा निर्माण झाल्या हे लक्षात घ्यावे लागते. या व अशा जगण्याचा आधार बनलेल्या सर्व अनुभूत कल्पनासूत्रांतून निष्पन्न धारणासूत्रांना धर्मसूत्रांचे स्थान प्राप्त झाले. त्यांचे पालन म्हणजे धर्मपालन होय असे सिद्ध होत राहिले. या धारणातत्त्वांना रूढीग्रस्ततेने स्वीकारून परिवर्तनाला वंचित होण्याचेही लोकव्यवहारात स्वीकारले गेल्याचे लक्षात येते.

५. मानवी जीवनप्रणालींमध्ये नित्य महाकारणाच्या चैतन्यपूर्ण स्वानुभूत आणि सहानुभूत अशा संवेदनेमुळे नित्यत्वाच्या मर्यादेत, अनियत्वाचा अर्थात मानवमात्रांसह जीवमात्र आणि वस्तुमात्रांच्या अर्थात जड आणि चेतनाचा चाललेला प्रवास ज्ञानकक्षेत आणि जीवनप्रणाली कक्षेत आणतांनाच चिद्विलासवाद, एकेश्वरवाद, अनेकेश्वरवाद, निरिश्वरवाद, निसर्गवाद, भौतिकतावाद या व अशा असंख्य वादांचा; प्रसंगी वितंडवादांचा, वर्तन आणि व्यवस्थाविषयक विधिनिषेधात्मक शास्त्रांचा सतत प्रादुर्भाव होत राहिला. एवढेच नव्हे तर ह्यांचा आग्रही विचार प्रणालीतील कर्मठपणासाठी झाला. तो एवढा टोकाचा होत राहिला की नित्यता आणि मानवी कल्याण या दोन्ही सकारात्मक आणि आधारभूत गोष्टींचाही विसर पडला. त्यातून प्रसंगी युद्धे झाली, साम्राज्ये, राष्ट्रे निर्माण झाली. त्यातील तीव्र संघर्ष निर्माण झाले. निष्ठा, श्रद्धा, विश्वास यांचे विपरित अर्थ लावले गेले. सत्+संग याऐवजी कुःसंग घडला अशी वेळोवेळी घसरण होत गेली. या घसरणीला थोपवितांना लोकनिष्ठ अध्यात्मवादी भूमिकेतून वेळोवेळी प्रणालींची परिवर्तनशील मांडणी करण्यात आली. धर्मांतरे घडविण्यात आली. हा धर्मवादाचा जागतिक इतिहास माणसाच्या ज्ञान आणि विज्ञान क्षेत्रातील विकासाबरोबर पुढे पुढे जात राहिला आहे. वैश्विक भूतमात्रांच्या विकास आणि कल्याणासाठी नित्यतेच्या आधाराने अनित्य अस्तित्वात सहानुभूतीने, सामंजस्याने सर्वकल्याणकारी सत्यनिष्ठ कर्मशीलतेने जगणे मानवी समूहाला अभिप्रेत आहे. त्यालाच पारखे झाल्याचे, धर्मग्लानी आल्याचे चित्र अनेकदा निर्माण झाले आहे. नवे धर्म, नवे पंथ, नवा विचार, नवे नैतिक विश्व, पारंपरिक रूढीग्रस्ततेवर आणि पाखंडपणावर, आघात करण्याचे कार्य अशा धर्मग्लानी अवस्थेकडे पाहून; अनेक ऋषी, मुनी, तपस्वी, धर्मवेत्ते, साधूसंत, विचारवंत, कलावंत, न्याय, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ यांनी विश्वा विरुद्ध उभे राहून लोकनिष्ठ अध्यात्मवादी भूमिकेने केले आहे. त्यातून अनेकदा धर्मसूत्रांमध्ये, शास्त्रांमध्ये धुरिणांनी सुधारणा केल्या आहेत. स्थलकाल परिस्थितीप्राप्त स्थितीगतीच्या दृष्टीने कालबाह्य झालेल्या रूढी धर्मबाह्य ठरविण्याचे कार्य या महामानवांनी केले आहे. त्यासाठी अध्यात्मिक चळवळी उभारल्या आहेत. वैश्विक अस्तित्वातील मानवांसह सर्वांचे कल्याण, सर्व अस्तित्वांना नित्यतेच्या आनंदासह अनित्य जीवनात जीवनानंद भोगण्यासाठी कर्मशील होण्याची ग्वाही, त्यासाठी राज्यशकट, पुरुषार्थकल्पना, धर्मनीतीतत्त्वज्ञान, न्याय आणि सुरक्षा हे वैश्विक धर्माचे मानव्य आणि दिव्यत्वनिष्ठ ध्येय प्रस्थापित व्हावे यासाठी प्रेममयतेचा संदेश देत जणू नित्यकारणाचे कार्य या महामानवांनी केले आहे. आजच्या वैज्ञानिक आणि बुद्धिप्रामाण्यवादी जीवनप्रणालीत तर या अध्यात्मिक उद्दिष्टाची आवश्यकता लोकसारणीच्या दृष्टीने आवश्यक झाली आहे.

६. धर्म, धर्मपीठे, धर्मानुयायी, धर्ममार्तंड, धर्मवेडे, धर्मनिष्ठ यांनी अशा विश्वकल्याणप्रद भूमिकेचा मुळात सर्वधर्म तत्त्वज्ञानामध्ये असलेला अध्यात्मविचार जागृत करण्याची आवश्यकता आहे. धर्म हा कल्याणप्रद जीवनाचा स्वाभाविक असा भौतिक, सामाजिक, नैतिक आणि अध्यात्मिक मार्ग आहे. लोकनिष्ठ अध्यात्मवाद हा सर्व प्रणालींचा मूळ स्वभाव असतो. तो असावयासच हवा. धर्मानुसरण करणाराला धर्माभिमान असतो. याचा अर्थ त्याचा आपल्या धर्ममार्गावर विश्वकल्याणप्रदतेच्या

दृष्टीने अध्यात्मिक आणि भौतिक दोन्ही स्तरावर विश्वास असतो. त्यातूनच धार्मिक जगातील मानवाचे केवळ दोन वर्गात विभाजन करतो. एक विद्यमान असा धर्मानुयायी आणि भावी धर्मानुयायी हे ते दोन वर्ग होत. हे वर्ग विश्वात्मक मानव्याच्या आणि मुक्ततेच्या उद्दिष्टाने मोठ्या कळवळ्याने धार्मिक मानत असतो. हेच त्या धार्मिकात जागवलेले संतत्व, उन्मनत्व, नित्यत्व असते. असे असले तरी लौकिकात या भूमिकेला कर्मठपणाने बाधित करण्याची शक्यता असते. हे वर्ग आणि कर्मठपणा समूळ नाहिसा होण्याचा मार्ग प्रत्येक धर्माच्या नित्य महाकारण तत्त्वाच्या अनुभूती सिद्धांतात सुप्त स्वरूपात असतोच. याचा पुनःउद्‌घोष करणे वैश्विक मानव्याच्या दृष्टीने आवश्यक असते. हा उद्‌घोष लोकनिष्ठ अध्यात्मवादी भूमिकेंच्या दोन घोषणांमधून एकविसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील विचारांतून स्पष्ट शब्दात उद्‌घोषित झाला आहे. त्या घोषणा म्हणजे, सर्वधर्मसमभाव आणि धर्मनिरपेक्ष जीवनप्रणाली ह्या दोन घोषणा होत.

**७.** सर्वधर्मसमभाव म्हणजे सर्वधर्म समभाव हे तत्त्व मूलतः वैश्विक भूतमात्रांच्या जडचेतनाच्या चराचराच्या कल्याणप्रद, सुरक्षित, आनंददायक अस्तित्व भोग्यतेसाठी, अस्तित्वासाठी माणसातील चैतन्यतत्त्वाने अर्थात परमेश्वराने निर्माण केले आहे. हे समजावून घेणे आणि सर्व भूतमात्रांविषयी, चराचराविषयी माणूसपणाची स्वाभाविक समदृष्टी बाळगून सर्व धर्मांविषयी पूज्य भाव अवलंबिणे होय. यासाठी स्वीकृत किंवा प्राप्त अशा धर्मसंस्कृतीसारणीचा स्वाभिमानपूर्वक अवलंब करीत असतांनाही निर्देशता, निरद्वंद्वता, निर्देशता अवलंबिणे आणि विशिष्ट दैवते, धार्मिक प्रणालींसह राष्ट्रभाव जागृत करीत असतांनाही स्वभूमी स्वसमूह यांच्या स्थायी संरक्षण आणि कल्याणाशी मर्यादित अभिमान ठेवूनही अन्य राष्ट्रे, समूह आणि अनुषंगिक धर्मधारणा यांविषयी आदरभाव ठेवण्याचे मानव्य जागृत ठेवणे होय. धर्माधिष्ठित राष्ट्रांच्या उभारणीची परंपरा जगात दिसते हे खरे. त्यातून वैश्विक पातळीवर व्यवहार करीत असतांना, केवळ भौतिकतेचा आधार पुरेसा नाही, तर धार्मिक समभाव दृष्टीचीही आवश्यकता आहे. वैश्विक मानवाविषयीची आत्मियता निर्माण होणे हे सर्वधर्मसमभाव घोषणेचे तात्त्विक



उद्दिष्ट होय. अंतराळात झेपावण्याची भाषा करतांना वर्ण, वंश, भूमी, दैवते आणि धर्म यांच्याविषयीची दुराभिमानी निष्ठा उपयोगाची नाही. किंबहुना अंतराळातील अस्तित्वांविषयी ही आत्मियता जोपासण्याची उदात्तता त्या नित्यकारणाला अपेक्षित आहे, ही संवेदना अपेक्षित आहे.

धर्मनिरपेक्ष जीवनप्रणाली याचा अर्थ धर्मधारणेला अध्यात्मिक जीवनाला दूर करून केवळ भौतिक जीवनाला विज्ञाननिष्ठ बुद्धिप्रामाण्यवादी भूमिका स्वीकारावी असा होत नाही. कोणतीही अनित्य गोष्ट नित्य निर्विकारी, निर्गुण अशा केवळ चैतन्य अस्तित्वाचे स्पष्टीकरण करू शकलेली नाही हा इतिहास आहे. तसे वैज्ञानिक प्रयोग सुरू आहेत. त्यातून काही निष्पन्नच होणार नाही असे म्हणणे हे सर्वांभूती तेच नित्यकारण व्यापून आहे असे म्हणणे अमान्य करण्यासारखे आहे. तसेच योगविज्ञानाने त्या नित्यकारणाचा थेट अनुभव घेतला आहे, हेही नाकारणे होय. तथापि जोपर्यंत भौतिक विज्ञानाच्या सहाय्याने ते बहुमततत्त्व स्पष्ट करता येत नाही तोपर्यंत विज्ञाननिष्ठेच्या दुराभिमानाने ते नाकारणेही इष्ट नव्हे. याचाच अर्थ धर्मनिरपेक्ष जीवनप्रणाली स्वीकारणे म्हणजे धर्मधारणा, धर्मश्रद्धा दूर सारणे नव्हे. धर्म हा शब्द अर्थगीततेने स्वीकारला तर धर्म म्हणजेच अध्यात्म आणि धर्म म्हणजेच मानव्य एवढा व्यापक विचार करता येतो व त्यानुसार वर्तनप्रणाली स्वीकार करता येते, हे लोकधुरीण धर्मवेत्ते, संत, महात्मे यांनी सिद्ध केले आहे. पसायदान प्रार्थनेतील विश्वात्मक भूमिका हे त्याचे स्पष्ट प्रमाण होय. धर्मनिरपेक्ष जीवनप्रणाली स्वीकारणे म्हणजे विशिष्ट धर्माच्या अधीन राहून राष्ट्र, लोकसमुदाय यांचा दुराभिमानपूर्वक विचार करता कामा नये, असे म्हणणे होय. धर्मश्रद्धा ही राष्ट्राभिमान, वंशाभिमान, वर्णाभिमान, समूहाभिमान किंवा विशिष्ट भूमि अभिमान स्वरूपात न बाळगता सर्वधर्मसमभाव या घोषणेतील तत्त्वानुसार, वैश्विक मानवाचा एवढेच नव्हे तर चराचराचा विचार करणे होय. खरेतर प्रत्येक धर्माचे सर्वोच्च तत्त्व याच गोष्टीचे प्रतिपादन करते हे लक्षात ठेवून धर्म या कल्पनेला वंश, वर्ण, जात, पंथ, राष्ट्र, लोकसमूह, भूमी या संकुचित संघमनस्कतेशी जोडू नये, असे म्हणावयाचे असते. धर्माशिवाय मानवाला

आधार देणारे दुसरे समर्थ अस्तित्व नाही. या अध्यात्मिक संवेदनेने मानव्यभावासह सर्व भूतमात्र चराचर यांचा सम दृष्टीने विचार करणे म्हणजे सर्वधर्मसमभाव आणि धर्मनिरपेक्ष जीवनप्रणाली होय. कोणत्याही वर्तनप्रणालीची, सारणीची तात्कालिकता आणि स्थलकाल परिस्थितीसापेक्ष परिवर्तनशीलता लक्षात घेऊन केवळ चिद्‌विलास, स्वरूप चराचर अस्तित्वाचा विचार करून सत्यनिष्ठेने धर्माचे पालन करणे, म्हणजेच धर्मनिरपेक्ष जीवनप्रणाली अवलंबिणे होय.

विष्णुमय जग । वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम । अमंगळ ।। कोणाही जीवाचा । न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर । पूजनाचे ।। ही सम दृष्टी म्हणजे धर्म, सर्वधर्मसमभाव आणि धर्मनिरपेक्ष जीवनप्रणाली होय.

•••



# अर्थ एव प्रधानः !

लोकव्यवहारात सामान्यतः ‘अर्थ’ या शब्दाचा धन, संपत्ती किंवा पैसा असा अर्थ आहे. हे विनिमयाचे आणि व्यावहारिक प्रतिष्ठेचे साधन म्हणून मानले जाते.

धर्म आणि कामसाधनेचे तर साधन ‘अर्थ’ हे आहेच; तथापि लाक्षणिक अर्थाने विचार केला तर मोक्षसाधनेचे साधनही अर्थ हेच आहे.

लोकजीवन व्यवस्थापनात स्थैर्याला, प्रतिष्ठेला, कीर्तीला आणि सुसंगोपनाला व सुशासनाला खूप महत्त्व आहे. या सर्व अवस्थांना आधारभूत असते ती संपत्ती. संस्थात्मक व्यवस्थापन, राज्यव्यवस्थापन, शेतीवाडी, घरेदारे, बांधबंधिस्ती, अन्न-वस्त्र-निवारा या मुलभूत गरजा आणि त्यातील श्रेष्ठ प्रतप्राप्ती, आरोग्य, सौंदर्यभावना, कलाव्यवहार या सर्व गोष्टींना धनाची अर्थात विनिमयकारक पैशांची आवश्यकता असते.

‘पैसा फेको तमाशा देखो’ असे सरसकट म्हटले जाते. पैशाने काय मिळत नाही, असा प्रश्नही नेहमीच ओठावर येतो. व्यवहारातील अनुभव असाच आहे. आजकाल मानसन्मान, प्रतिष्ठा, पदे हीही पैशांवर मिळतात. देवदर्शननामक गोष्टही पैशाने होते. पैशाच्या स्पर्धेत पापभिरूता परागंदा झाली आणि पैशाचा पाशवी मायाबाजार निर्माण झाला. पैशाने पंचतारांकित सुखप्राप्ती हेच जीवनव्यवहाराचे ध्येय बनले. पैशाच्या जोरावर सत्ता आणि सत्तेच्या जोरावर पुन्हा पैसा असे दुष्टचक्र निर्माण झाले. यात सर्वात्मक सत्तेचा विचार बळावला. सर्वात्म परमेश्वराच्या प्राप्तीसाठी, सर्वात्मक

सुखसमृद्धीचा सेवामार्गही लोप पावला. पैशाच्या धुंदीने रावण, भस्मासूर, हिरण्यकश्यपू, मणिमल्ल आदि आदि राक्षसीवृत्ती स्वतःची मालमत्ता म्हणून विश्वातील चराचराकडे पाहू लागले आणि अर्थपुरुषार्थाचे सर्वंकश अहंकारात रुपांतर झाले. अर्थार्जन नावाचा पुरुषार्थ पाशवी स्वार्थांध राक्षसी वर्तनात जणू रुपांतरित झाला. आणि समाज अर्थपुरुषार्थालाच पारखा होऊन दास्य लाचारीचे शोषित जीणे जगू लागला किंवा अन्य सर्वांना शोषित करून मदांध खणाने शोषक तरी झाला. शोषकांचा वर्ग सर्वोच्च स्थानापासून शेवटच्या माणसापर्यंत वृत्तीस्वरूपातच दिसू लागला. 'चोरांचे संमेलन' असावे तसे प्रत्येकच या ना त्या परीने शोषक झाला. कोणी कलियुग म्हणून या प्रवृत्तीची संभावनाही करू लागले. भ्रष्टाचाराच्या फेऱ्यात सापडलेल्या माणसांना भ्रष्टाचार करून संपत्तीसंचय करणे हाच पराक्रम, पुरुषार्थ वाटू लागला. न्याय, नीती, शब्दविश्वास, शीलमर्यादा, वर्तनसभ्यता, वचने, अभिवचने, पिढ्यापिढ्यांची सामाजिक, धार्मिक गुंतवणूक, स्थैर्य त्याला केवळ भावनिक भंपकपणा वाटू लागला. पिशाच्याने झपाटावे आणि त्रस्त करावे तसे पैसा मिळविण्याच्या व्यसनाने माणसाला झपाटले. दानधर्म, लोकसेवार्थ खर्च, सणोत्सव, मठमंदिरे, सेवाकार्ये यासाठी देणग्यांचा पाऊस दिसतो. त्यात तथाकथित बड्या धेंडांच्या देणग्या म्हणजे केवळ स्वतःच्या भ्रष्ट संपत्तीपीपासेवरील सात्त्विक शुभ्रवस्त्राचे आच्छादन असते. सरळ सामान्य जनतेला गाय बनवून कसाबांचे कत्तलखाने चालविण्याचा तो देखावा असतो. ते दान हा समाजासाठीचा सेवाभाव वा त्याग नसतो. तो समाजाला मनमुरादपणे नागवण्याचा परवाना असतो. यातूनच अर्थासाठी सत्तामार्गही अवलंबिला जातो. सत्ता राबविणे म्हणजे बहुजन हिताय, बहुजन सुखाय राज्यकारभाराच्या प्रदर्शनातून लयलूट करायची असते. यातून बेहिशेबी मालमत्तेचे डोंगर उभारायचे असतात. संस्कृती स्वरूपिणी, गृहिणी, उदात्त, सात्त्विक, अध्यात्मिक आणि मानव्याचे बाळकडू पाजणारे गुरुजी, लोकनेते, सच्चे म्हणविणारे मित्रही अहमहमिकेने भ्रष्टाचाराचे सल्ले देण्यात धन्यता मानतात. यालाच प्रयत्नांती परमेश्वर म्हणण्यापर्यंत या सर्व विश्वस्तांची मजल जाते आणि माणूस म्हणून जगणाऱ्या



माणसातील मानव्यालाच हैवानाचा आकार प्राप्त होतो. अनाचार, दंभाचार आणि भ्रष्टाचार पूर्ण आचरणानेच अर्थपुरुषार्थ साधना घडते असा स्वार्थपिंड अवतीर्ण होतो. त्यात धर्म, काम, मोक्ष साधणारा अर्थपुरुषार्थ स्वत्व सोडून सत्तांध होतो. म्हणूनच पुरुषार्थांचे जागरण करण्याची आवश्यकता निर्माण होते. जगण्यातील विनिमयाला अर्थपूर्णता प्राप्त करायची तर पुरुषार्थाचे व्यवहारात रामतत्त्व जागवण्याची आवश्यकता असते. अन्यथा स्वतःबरोबर सर्वांना अशांततेच्या नरकयातनेत तडफडत बसवते. 'हे राम' म्हणण्याची पाळी येते. म्हणून धारणांचा आधारतत्त्व असलेला विनिमयात्मक अर्थ नीट लक्षात घ्यावा लागतो. त्याचे एक सूत्र 'जोडूनिया धन उत्तम व्यवहारे उदास विचारे वेच करी' हे आहे.

'धन' अर्थात 'अर्थ' हे विनिमयाचे साधन आहे असे मानवाच्या लक्षात आल्यापासून मौल्यवान वाटणाऱ्या वस्तु, वनस्पती, जीव यांना मानवाने साधन स्वरूपात स्वीकारले आणि त्यांचा संचय सुरू केला. यातूनच विनिमयासाठीच्या साधनसंपत्तीवर सामर्थ्याचे मोजमाप होऊ लागले. यात प्राचीन अवस्थेत मानवाने कवडी, शंख, शिंपले, दात, शिंगे, नखे यांना विनिमयाचे साधन बनविले. पुढे यात मौल्यवान दगडांची भर पडत गेली. मोती, हिरे, माणके यांना महत्त्व प्राप्त झाले. सुगंधी, टिकावू, जळावू आणि हलक्या तरंगणाऱ्या तैल वनस्पतींच्या काष्ठ साधनांनाही त्यात समाविष्ट करण्यात आले. स्थावर आणि जंगम मालमत्ता 'अर्थवत्ते' समाविष्ट झाली. वैयक्तिक, सामाजिक आणि राजकीय पातळीवर या साधनरूप वस्तुविनिमयाला महत्त्व येत गेले. यांत जमीन, घरेदारे या स्थावर मालमत्तेबरोबर उपरोक्त वस्तूमध्ये गोधनाचा समावेश ऋषीकालीन संस्कृतीतच झाला. या गोधनाला सर्वाधिक महत्त्व आले. गोधनात हत्ती, उंट, खेचर, घोडे, गाढवे, वाघ, सिंह यांचा समावेश होता. यांस जोडून पोपट, हंस, मोर आणि कबुतरे यांना महत्त्व आले. वस्तुविनिमयात धातूंच्या मुद्रांची किंवा मोहरांची भर पडली. आणि या सर्व प्रकारच्या साधनात्मक संपत्तीमत्तेसाठी स्पर्धाही सुरू झाली. चोऱ्यामाऱ्या, द्वंद्वे, युद्धे, पुरस्कार, क्रयविक्रय या सर्वांमध्ये हे साधन वापरले जाऊ लागले. यातच

धान्यधनाचा विनिमय म्हणून थेट उपयोग होऊ लागला. या सर्व संपत्तीरूपांच्यामुळेच मानवी जीवनाला स्थैर्य व ग्राम, नगर, महानगर, राजधानी, गट, कोट, किल्ले आदि आकार प्राप्त झाले. व्यवहाराला गती मिळतांना जनावरांबरोबरच चाकांचा उपयोग होऊ लागला आणि गाडी, रथ, महारथ आणि विमान अस्तित्वात आले. त्यांचाही विनिमयात उपयोग होऊ लागला. थेट वस्तु, जीव, काष्ठ विनिमयातून मोहरा, मुद्रा स्वरूपात चलन आले. रत्न, मौल्यवान धातू जसे सोने, चांदी आदि यांचा विनिमयात उपयोग होऊ लागला आणि त्यांच्याच आधारे सर्व भौत्तिक वस्तुमात्रांचे परिमाण विनिमयासाठी ठरले गेले आणि प्रत्यक्ष वस्तुविनिमय थांबला. तथापि त्यांची किंमत संपत्तीमत्तेत धरली जाऊ लागली.

या सर्व स्वरूपात व्यवहारातून क्रयविक्रयातून धन प्राप्त करणे यास पुरुषार्थ म्हटले जाऊ लागले. त्यासाठी प्रत्यक्ष श्रम आणि व्यापार यांतून हे धन प्राप्त करण्याच्या पद्धती निर्माण झाल्या. व्यवस्थापनेलाही विनिमयाचे परिमाण प्राप्त होऊन श्रमाचा मोबदला, बिदागी, वेतन, दक्षिणा या स्वरूपातही धनप्राप्ती सुरू झाली. श्रम, कौशल्य, कला, क्रीडा आणि व्यापार यांना याच विनिमयाचे परिमाण लाभून अर्थसाधनास्वरूप पुरुषार्थास विशेष महत्त्व प्राप्त झाले. आज तर भौत्तिक साधन आणि मुद्रा यांच्या गर्दीत माणूस हरवला आहे. येनकेन प्रकारेन ही भौत्तिक साधने आणि मुद्रा मिळविणे याला पुरुषार्थ मानण्यापर्यंत माणसाची मजल गेली.

‘आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने’ असे म्हणणारे जगद्गुरू तुकोबाराय भाषा हे धन मानीत असत. त्यामुळे ‘वेचूनिया धन उत्तम व्यवहारे’ हे सूत्र भाषेच्या बाबतीतही त्यांना अपेक्षित आहे. पैसा जसा ‘चारत बसवते आणि चारातून उठवतो’ तसेच ‘बोल’ किंवा शब्दाचेही आहे. ‘तोंडाळपणा’ बरा नव्हे, ‘मूं में आया बक् दिया’ हे बरे नव्हे. तसेच शब्दांचा उपयोग खोटे बोलण्यासाठी, उगा स्तुती करण्यासाठी, लाखोली वाहण्यासाठी, टिंगलटवाळी करण्यासाठी अशा प्रकारे करू नये. भगवान बुद्धांना ही भाषावापर म्हणजे शब्दांच्या माध्यमातून केलेली हिंसा वाटे. विश्वाचे ज्ञान भरून ठेवणारे व वाहत्या पाण्यासारखे सर्वांपर्यंत पोचविणारे साधन म्हणजे



शब्द. शब्द आणि भाषा स्वरूपात परमेश्वराने आपणास केवढे श्रीमंत केले आहे हे लक्षात घेऊनच शब्दांचा विनियोग केला पाहिजे. ‘मितभाषी’ हा गुण मानला आहे. मृदु, मनोज्ञ, श्रवणसुखावह अशी भाषा वापरणे अनेक प्रकारे लोकसंबंध जपता येतात. तसेच शब्दांचेच शस्त्र वापरून आवश्यक तेथे त्यांतील ओजस्वितेने शिवखड्गासारखे किंवा रामबाणासारखे प्रहार करता येतात आणि अंगदशिष्टाई करून युद्धेही जिंकता येतात. ‘बोल असावा नेटका, बोल असावा स्पष्ट व्यवहार साधक!’ असे समर्थ म्हणतात ते याचसाठी. खट्याळपणानेच म्हणायचे तर अवघा ‘हवाला’ बाजार शब्दावरच चालतो. आडतेबाजारातही शब्दाला ‘क्रेडीटकार्ड’ आणि ‘डेबिटकार्ड’ एवढे महत्त्व आहे. बँकांच्या विश्वासार्हतेपेक्षाही मानवी भावना आणि नीतीमत्तेची आणि विश्वासार्हतेची संपत्ती एकट्या शब्दसंपत्तीत दडली आहे हे विसरून चालणार नाही. ‘एक वचनी’ ‘राम’ हेच तर शब्दाचे खरे सामर्थ्य आहे. ‘वचन’ म्हणजे ‘शब्द’. वाचेच्या रूपाने परमेश्वराने चराचरसृष्टीतील अवघे सामर्थ्य आज तरी एकट्या मानवाच्या स्वाधीन केले आहे. जोपर्यंत ‘वाचा’ ‘शब्द’ आणि ‘राम’ रूपात वापरत आहोत तोपर्यंत आपण केव्हाच दरिद्री होत नाही. हे धन वानवेतरांजवळ नाही हे लक्षात घेऊन रामार्थ साधावा. त्यासाठी माणूस म्हणून स्वतःला प्रकटवावे. त्यासाठीच तर ‘धर्म’, ‘काम’ आणि ‘मोक्ष’ या रामार्थांची निर्मिती.

परमेश्वर अर्थात पांडुरंग, शिव, ब्रह्मदेव हे मोठेच ‘मॅनेजमेंट गुरू’ आहेत. त्यांनी रामार्थचतुष्टय मांडून माणसातील व्यष्टी आणि समष्टी रूपाचे व्यवस्थापन केले आहे. हे व्यवस्थापन भावना, कल्पना, प्रेम यांच्या विनिमयासाठी भाषा बहाल करून केले आहे हे लक्षात घेऊन ‘शब्दधन’ साधावे.

‘पायोजी मैने राम रतन धन पायो’ असे म्हणणारे कबीर प्रेम धनाकडे बोट दाखवितात. कुसुमाग्रज ‘प्रेम आहे संस्कृतीचा सारांश’ असे म्हणतात. प्रेमाला कोणतीही मर्यादा नसते, तसेच ते अभेद्य आणि निखळ असते. त्यामुळे त्याची चोरीमारी कोणी करत नाही. ‘प्रेम’ म्हणजेच जीवनातील ‘राम’. ‘पैसा आहे तर सारे आहे’ तसेच प्रेम आहे तर सारे

आहे. माणसातील प्रेमाचा लय हाच सर्वात मोठा प्रलय होय. म्हणूनच 'प्रेम' हे सर्वश्रेष्ठ धन होय. अर्थसाधना म्हणजे मायासाधना असे आपण म्हणतो. माया म्हणजेच प्रेम असे लक्षात घेतले तर विनिमयाची क्षणभंगूर साधने लोप पावतात आणि उरतो फक्त रामार्थ हाच जीवनातील खरा अर्थ होय.

पण व्यवहारात विनिमयासाठी शब्द, प्रेम, नीती, विश्वास या गोष्टी चालत नाहीत. तेथे विनिमयाचे भौत्तिक साधन लागते. म्हणजेच रोकडा पैसा लागतो. त्यामुळे धनाचे अन्य सर्व प्रकार व्यवहारात व्यर्थ ठरतात. होय हे वरवर पहाता खरेही आहे. मात्र या विनिमयाच्या अन्य स्वरूपांचे किंवा प्रकारांचे सामर्थ्य त्या रोकड्या पैशाच्या मुळाशी भक्कम पायाभूत असेल तरच त्या रोकड्याला शीलाचे सामर्थ्य गवसते. मवाली, गुंड, चोर, दरोडेखोर, स्मगलर, वेश्या आदि सर्व भ्रष्टाचारी पैसा कमावतात, पैसाच विनिमयात वापरतात. असे असूनही ते मानव्याला आजवर विकत घेऊ शकलेले नाहीत. आई, प्रेम आणि ज्ञान या गोष्टी त्यांच्या विनिमयात त्यांना विकत घेता येतील का?

भौत्तिक सुखांच्या मागे मोठ्या गतीने पळत निघालेल्या आजच्या तथाकथित हुशार माणसांना भौत्तिक सुखे, ऐश या पलिकडे माणसे जोडण्याचे सुख, अश्रू पुसण्याचे सुख, स्वतःबरोबर समाजाला सांभाळण्याचे सुख अनंतपटीने मोठे असते. ते पैसा नावाच्या विनिमयाच्या साधनाने मिळत नाही. त्यासाठी विनिमयाची अर्थपूर्ण अशी वेगळ्या प्रकारची साधनेच वापरावी लागतात. हे लक्षात घेऊन अर्थाचा सार्थ विनियोग करणे म्हणजेच खरा रामार्थ होय. अन्यथा आपणच आपल्याच आचाराने अनर्थ ओढवून घेण्याचाच प्रलयप्रसंग ओढवेल हे ध्यानात ठेवूनच 'अर्थ' पुरुषार्थाची साधना करावी.

•••



# लैंगिक उन्माद म्हणजे काम पुरुषार्थ नव्हे

सेक्स एज्युकेशन शालेय स्तरावर देणे आवश्यक आहे, अशी मागणी समाजप्रबोधक, आरोग्य सेवेतील विविध स्तरावरील सक्षम अधिकारी, काही शिक्षणतज्ज्ञ सातत्याने करीत आहेत. कुटुंबनियोजन कार्यक्रम चळवळीच्या स्वरूपात राबवला जात आहे. लोकसंख्येच्या प्रश्नाने विक्राळ रूप धारण केले आहे. गेल्या काही दिवसांत-महिन्यात बलात्कार घटनांची वाढती संख्या सर्व न्यूज चॅनलची हॉट डिश झाली आहे. या संदर्भात कारणमिमांसा, चर्चा केली जात आहे. मध्यंतरी सेक्स स्कँडल आणि सेक्स रॅकेट उघड करण्याची मालिकाच प्रदर्शित झाली. कॉलगर्ल्स, बारबाला, रेव्ह पार्ट्या, प्रतिष्ठित-सुप्रतिष्ठित व्यक्तींना आणि भोगराक्षसांना प्रतिष्ठित समाजातील नवतरुणी पुरविल्या जाण्याच्या बातम्याही प्रसिद्ध होतात. स्त्रियांना असुरक्षित वातावरणात जगावे लागत असल्याबद्दल, प्रशासन आणि व्यवस्थांवर आगपाखड होत आहे. प्रसारमाध्यमे, सिनेमाक्षेत्रे यातून उत्तान नग्न शृंगाराबरोबरच भोगवादींची अत्यंत भडक चित्रे प्रसिद्ध होत आहेत. जाहिरातीतूनही नग्नतेचे प्रदर्शन करून मार्केटिंग क्षेत्रात सेक्स फिलिंग्जचा उपयोग करून व्यवहार साधला जात आहे. खरोखरीच अवघा समाज लिंगपिसाट झाला आहे काय? कामप्रवृत्तीचा महास्फोट झाला आहे काय? कामवासना, कामतृप्ती या संबंधात अतिगंभीर प्रश्न का उपस्थित होत आहेत? गतिमान, साधनांश्रयी, गर्दगर्दीत माणूस हरवल्याने त्याच्यातील काम सहजप्रवृत्तीचा उद्रेक झाला आहे काय? कामतृप्ती ही

आंबटशोक करावा, टाइमपास करावा इतकी स्वस्त आणि पिसाट अवस्था निर्माण झाली आहे का?

सिग्मन्ड फ्राईड नावाच्या मनोवैज्ञानिकाने कामप्रवृत्ती हा संपूर्ण जीवनप्रणालीचे मूळकारण मानले असून, अगदी शैशवावस्थेपासून स्त्री-पुरुष आकर्षण हे कामकेंद्र असल्याचा सिद्धांत मांडला आहे. तर कार्लमार्क्सने भूक हा जीवनप्रणालीचा आधार मांडला आहे. या दोन्ही गोष्टींकडे केवळ प्राणीपातळीवर विचार घेऊन विचार मांडले गेले तर मानवाच्या भावनात्मक श्रद्धापूर्ण, प्रेममय आणि समूहजीवनासाठीच्या त्यागमार्गी सांस्कृतिक जीवनप्रणालींना तीलांजलीच दिली पाहिजे. मानवी जीवन हे व्यक्तिगत पातळीवर किंवा व्यक्तिकेंद्रित्वाने भोगनिष्ठ होणे वैश्विक मानवांच्या पारंपरिक सारणींना धक्का देणारी आहे. म्हणूनच हे भोगनिष्ठ विचार आणि वर्तन दूर सारण्यासाठी नैतिक मूल्यांचे प्रसारण करणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रसारमाध्यमे आणि प्रबोधन परंपरांनी सिंहावलोकन केले पाहिजे.

जीवसृष्टी ही अपरिहार्यपणे कर्मशील असते. जन्माला येणाऱ्या जीवमात्राला मरेपर्यंत हालचाल करावीच लागते. पोहता न येणाऱ्याला पाण्यात फेकून दिले, तर तो मरेपर्यंत गटांगळ्या खात का होईना आपली जगण्याची धडपड करीत राहतो. जगणे एवढेच त्याचे ध्येय असते. तथापि का जगतो तेही त्याला कळत नसते. मरेपर्यंत निसर्गाच्या चक्रात, जन्म पावणे, आहार, निद्रा, भय आणि मैथून या मार्गाने परिणत देहाचे विकार भोगणे. मृत्यू आला की मरून जाणे. म्हणजे जीवाचे जगणे आणि मरणे हा केवळ प्रकृती आणि चैतन्यतत्त्वप्राप्त चक्रनेमी क्रम असतो. अवघी प्राणीसृष्टी आणि वनस्पतीसृष्टी या प्रकृतीच्या आविष्कार आणि विळ्याच्या चक्रात सापडलेली असते. केवळ अनिवार्यपणे अस्तित्वाची धडपड हाच त्याच्या जगण्याचा अर्थ असतो. त्यामुळे नकळत भुकेच्यावेळी अन्न, झोपेच्यावेळी झोप, जनप्रक्रियात्मक वासनेप्रसंगी संभोग मिळाले की त्यांची धडपड स्थिरावते. हे लाभत नसेल तर त्याला दुःख वाटते आणि कष्टप्रद हालचाल सुरू होते. ते मिळण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या संकटांविषयी भीती वाटते. याप्रसंगी आकांताने जीवाचा संघर्ष सुरू होतो. एकूण प्रकृती आणि पुरुष



(चैतन्यतत्त्व) यांच्या आविष्कार लीलेत जीवसृष्टीचा हा जन्ममृत्यू क्रियातील अनिवार्य अशा संघर्षाचा क्रम सुरू असतो. सर्व जीवसृष्टी ही सृष्टीची लीला अनिवार्यपणे भोगण्यासाठीच जन्म पावतो असे वाटते हे खरे.

या जीवसृष्टीत माणसाचे अस्तित्व अन्य जीवांप्रमाणे आहे का? याचे प्रथमदर्शनी उत्तर आहे, हेच द्यावे लागते. परंतु माणसाने त्याला मिळालेल्या अंतःप्रेरणा, सौंदर्यदृष्टी प्रज्ञा, बुद्धि, कल्पनाशक्ती आदि मनःशक्तींच्या सहाय्याने जीवअवस्थेतील पुरुषतत्त्वाचा अर्थात परमात्मतत्त्वाचा अनुभव घेतला आणि प्रकृती आणि पुरुषाच्या लीलात्मक आविष्कारातील, माणसाने स्वतःला एक खेळाडू बनविले. हे त्याचे अन्य प्राण्यांपेक्षा वेगळेपण आहे. प्राकृतिक जीवतत्त्वाच्या अविनाशित्वाचे ज्ञानही त्याला झाले. हे अविनाशित्व हेच आपले खरे अस्तित्व आहे याचे भान आणि जाण केवळ मानवी मनालाच आहे. यामुळेच माणसाने आपले अस्तित्व केवळ चक्रनेमीक्रम म्हणून स्वीकारले नाही. त्याने या अस्तित्वाला संस्कृतीचे कोंदण दिले. या कोंदणाला चिरंतनाची संवेदना भरली. गतिमान तरी स्थैर्यात्मक आणि मोक्षप्रद (मुक्तआनंदप्रद) असे स्वरूप अस्तित्वाला देण्यात त्याने, विद्या आणि कला अस्तित्वात आणून त्याने यश मिळविलेले. माणसाची सनातन संस्कृती, धर्मधारणा यांच्यासह जीवनाला अर्थपूर्ण करण्याची प्रक्रिया हे त्याच्या या ज्ञानपूर्ण धडपडीचे फलित होय.

'ज्ञान बनो कर्मशील । कर्म ज्ञानवान ।।' ही मंगेश पाडगांवकर यांची काव्योक्ती माणसाचे हेच जीवन ध्येय प्रदर्शित करते.

श्री संत माऊली ज्ञानेश्वरांनी तर पसायदानातून माणसाच्या ध्येयनिष्ठ जीवनसारणीची लोकनिष्ठ अध्यात्मवादी विचारसंहिता मांडली.

माणसाची ही जीवनधारणा पुरुषार्थावर उभारली आहे. धर्म, अर्थ, काम, मोक्ष असे हे पुरुषार्थ चतुष्टय होय. पुरुषार्थाविषयी निरुपण करतांना पु. गुरुवर्य श्रीरामकृष्ण क्षीरसागर महाराज म्हणतात, आपण चार पुरुषार्थ मानतो. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष पुरुषार्थ म्हणजे अंतिम साध्य. जीवनाचं अंतिम मूल्य म्हणजे पुरुषार्थ. या चार पुरुषार्थामध्ये धर्म हा पहिला आणि मोक्ष हा शेवटचा पुरुषार्थ मानला आहे. अर्थ व काम

यांच्यासंबंधी गृहस्थाश्रमाच्या संदर्भात विचार झालेला आहे. हे दोन पुरुषार्थ धर्माच्या चौकटीत ठेवले की ते कल्याणकारक असतात. मुळात ते वाईट नाहीत. त्यांच्यामुळं वैयक्तिक अभ्युद्य साधता येतो. सामाजिक उत्कर्षही त्यांच्यामुळंच होतो. पण हे दोन्ही पुरुषार्थ धर्मविहित पद्धतीनं आचरणात आणले पाहिजेत. (धर्मदर्शन, श्री दत्त देवस्थान ट्रस्ट वेदांतनगर, अहमदनगर, प.आ. २००५)

धर्म विचार समजावून घेतल्याशिवाय अर्थ, आणि काम या पुरुषार्थाचे कल्याणकारक स्वरूप उलगडत नाही. स्वामी विवेकानंद म्हणतात, कर्म, उपासना, मनःसंयम वा ज्ञान यांपैकी कोणत्याही एकाचा वा एकापेक्षा अधिकांचा किंवा सर्वच उपायांचा अवलंब करून ते उद्दिष्ट साधा आणि मुक्त व्हा यातच सगळा धर्म आला. ते म्हणतात, धर्म ही अशी वस्तु आहे की जिच्यामुळे पशूचे मनुष्यात आणि मनुष्याचे ईश्वरात रूपांतर होते. ते सांगतात, मानवजातींच्या वासनांचे व इच्छाशक्तीचे नियमन करणाऱ्या नियमांचे ज्ञान प्राप्त करून घेणे हे सर्वश्रेष्ठ ज्ञानार्जन होय. ते म्हणतात, परोपकार करणे हा धर्म होय. दुसऱ्याला पीडा देणे हा अधर्म होय. सामर्थ्य आणि पौरुष हा धर्म होय. दौर्बल्य आणि भेकडपणा हा अधर्म होय. धर्माचा विचार स्पष्ट करतांना धर्माची तात्त्विक अंगे ही कर्मपर अभंगातून सफल झाली पाहिजेत असा विचार ते मांडतात. म्हणजेच धर्म हा पुरुषार्थ अर्थ, काम यांना नियमित करणारा आणि मोक्ष या पुरुषार्थाची वाट सुकर करणारा असा मानवी पुरुषार्थ होय. म्हणूनच पुरुषार्थ विचार हा व्यक्तिनिष्ठ नव्हे तर लोकनिष्ठेने करावा लागतो.

कुटुंबसंस्था हा वैश्विक मानवी समाज आणि संस्कृतीचा कणा आहे. त्यामुळे पुरुषार्थांचा विचार हा व्यक्तिनिष्ठेने करून भागत नाही तर प्रामुख्याने तो समाविष्टनिष्ठेनेच करावा लागतो. म्हणूनच पुरुषार्थ सिद्ध करण्यात सर्वांसाठी व्यक्तिनिष्ठेचा त्याग हे धर्मवर्तनाचे महान सूत्र बनते. कुटुंब संस्थेत पदार्पण करतांना स्त्री-पुरुषांना 'धर्मेच, अर्थेच, कामेच नातिचरामि ।' अशी प्रतिज्ञा घ्यावी लागते. या अर्थ कुटुंब संस्कृतीत पुरुषार्थ संपादनात स्त्री-पुरुष सहयोगाची स्पष्ट अपेक्षा आहे. धर्माच्या



तात्त्विक अंगांना आचारात्मक अधिष्ठान देणे जीवनसारणीच्यादृष्टीने आवश्यक असते. या आचारधर्माचे दृश्य अंग म्हणजे संस्कृती होय. संस्कृती ही प्रकृतीला सामूहिक सहजीवनाच्या दृष्टीने नियमित करते. त्यामुळेच व्यक्तीला त्यागात्मकतेने व कर्तव्यबुद्धीने जक्षावे लागते. म्हणूनच पुरुषार्थ सिद्ध करतांना सामाजिक व्यवस्था आणि स्थितीगती यांच्या अंगाने यथाशक्ती, यथास्थिती, सर्वकल्याणात्मक प्राप्त कर्म हा स्वधर्म ठरतो आणि तो पुरुषार्थावलंबी कर्मपरतेने आचरणे हेच सर्वकल्याणप्रद असते. पुरुषार्थातील अर्थ आणि काम या पुरुषार्थांचा विचार या प्रकारे धर्माच्या चौकटीतच करणे मनुष्यमात्र अस्तित्वाला अर्थात माणुसकीला धरून आहे.

काम हा पुरुषार्थ कुटुंबसंस्थेच्या केंद्रस्थानी तसेच प्रजननाच्या आणि साफल्याच्या दृष्टीने अतिमहत्त्वाचा म्हणूनच विचारात घ्यावा लागतो. काम ही सृष्टीची प्रकृती आहे. प्राण्यांमध्ये प्रजननासाठी ती विशिष्ट शरीर विकसित अवस्थेत उत्पन्न होते व सहज प्रवृत्ती स्वरूपात, नर आणि मादी यांच्यातील संभोगातून प्रजनन स्वरूपात दृश्य होते. मनुष्येतर प्राण्यात कुटुंब समाज या विषयीच्या जाणिवा निसर्गावलंबी असतात. तेवढ्याच मर्यादेत त्या प्रकट होतात. त्यामुळे नर आणि मादी एकत्र येणे त्यासाठी प्रसंगी नर आणि मादी यात अनिर्बंध स्पर्धा होणे अपरिहार्य असते. मात्र काम प्रवृत्ती आणि जनन प्रक्रिया यांचा निसर्गावलंबी काळ मर्यादित असतो.

माणसांतील काम प्रवृत्ती यापेक्षा वेगळी नसली तरी ती धर्म आणि संस्कृतीच्या चौकटीत बांधून विनियोगीत करण्याची व्यवस्था माणसाने निर्माण केली आहे. काम ह्या सहजप्रवृत्तीचा विनियोगही स्त्री-पुरुष, समानतेसाठी, वंश, कुटुंब, इतिहास, वर्तमान आणि भविष्य यातील मानवी परंपरा या संदर्भात धर्ममूलकतेने करण्याचे बंधन स्वतःभोवती व समग्र मानवी समाजात, नैतिक व्यवहार मूल्यांसह घालून घेतले. सहजप्रवृत्तीचे पुरुषार्थ म्हणून नियमन करीत जीवन उद्दिष्ट स्वरूपात त्यांचा स्वीकार व विनियोग करण्याचे मूल्य स्वीकारले. त्यातूनच भ्राता, पिता, पुत्र, पती, मित्र, सखी, पत्नी, पुत्री, माता-भगिनी आणि तत्सम अनेक

प्रकारची नाती संयमित झाली. हीच धर्माची चौकट. या कुटुंब, नाती, वंश, समाज आणि सांस्कृतिक परंपरा यांच्या चौकटीत स्वधर्म कर्तव्य एवढ्याच भावनेने म्हणजेच निष्काम कर्मपरतेने या सहज प्रवृत्तीचा विनियोग करण्यासाठी, इंद्रिय दमन, नियमन, ब्रह्मचर्य इ. चा अवलंब करून अतिसंयमितपणे व कठोर व्रतस्थतेने काम पुरुषार्थ सफल करणे अपेक्षित आहे. काम प्रवृत्तीला दिलेले हे संयमित स्वरूप स्त्री आणि पुरुष यांनी निग्रहाने पाळणे हे धर्म पुरुषार्थ सिद्ध होण्यास आवश्यक आहे. धर्म ही सर्वहितैशी व्यवस्था सिद्ध करतांना धर्माची मानवी समाजनिर्मित, धर्मकर्मात्मक नियमनांचा अवलंब करणे अभिप्रेत असते. कुटुंबव्यवस्थेत, समाजव्यवहारासह जगत, जीवनसारणीचा अनुसार करीत आत्मसाक्षारी अवस्थेत पोचून सर्वकल्याणप्रद अशी जीवनमुक्तता साधता येते. काम हा पुरुषार्थ निसर्ग संवेदनेच्या आणि सामाजिक संवेदनेच्या पातळीवर सिद्ध करावा लागतो. त्यासाठी शरीर आणि मन यांची निश्चयात्मक नियमित सबल आणि पोरुषात्मक अर्थात चैतन्यमुक्त अवस्था आवश्यक असते.

काम या पुरुषार्थाचा जननप्रक्रियेशी जसा संबंध आहे, तसा सर्व प्रकारच्या मानसिक आणि शारीरिक, सुखकल्पनामूलक इच्छापूर्तीशीही संबंध आहे. त्यामुळेच काम प्रवृत्ती ही जीवावस्थेला व्यापणारी आहे. याही बाबतीत समूहजीवनाची धर्ममूलक नैतिक बंधने स्वीकारून स्वार्थ आणि समाजार्थ साधीत परमार्थ साधणे अभिप्रेत आहे. गीतेतील कर्मयोग ह्याची व्यापक साधना उपदेशित करतो. निष्काम कर्मयोग कल्पनेचा संबंध केवळ अध्यात्मसाधनेशी वैयक्तिक नाशी नाही; तो भौतिक समूहजीवनात्मक व्यवहारातील नीतीमत्तेशी अर्थात सर्वसमावेशक व सर्वहितैशी कर्मसाधनेशी आहे हे ध्यानात घ्यावे लागते. दुसऱ्यासाठी जगणे तेच खरे जगणे, हेच काम, पुरुषार्थ सिद्धतेचे मूल्य होय.

●●●



# 'मोक्षसाधना' हा मूलाधिकार

जगाच्या इतिहासातील दिव्याद्भूत अनुभव म्हणजे स्वतंत्रता देवतेचा साक्षात्कार होय. या स्वतंत्रता देवतेचे स्तोत्र स्वातंत्र्यवीर सावरकरांनी रचले. पुराणांच्या परंपरेत ऋषींना अनुभूत झालेल्या शक्तीस्वरुपिणीची स्तोत्रे येतात. स्वा. सावरकर हेही एक द्रष्टे ऋषी. त्यांना 'स्वातंत्र्य' शक्तीसंवेदनेचे दिव्य दर्शन घडले. 'अध्यात्म' म्हणजे 'वेदान्त' आणि अध्यात्माचे वेदान्त वर्णित रूप म्हणजे 'स्वातंत्र्य' अशी दिव्य संवेदना विनायकांच्या मनात प्रकटली आणि त्यांच्या प्रतिभेला 'स्वतंत्रतेचे स्तोत्र' स्फुरले. स्वतंत्रता देवतेचे, महन्मंगल, शिवास्पद, भगवतीचे प्राकट्य अनुभवून; स्वा. सावरकर उद्गारले–

*'मोक्ष मुक्ति हीं तुझीच रुपें, तुलाच वेदांती*
*स्वतंत्रते भगवती । योगीजन परब्रह्म वदती*
*जें जें उत्तम उदात्त उन्नत महन्मधुर ते ते*
*स्वतंत्रते भगवती । सर्व तव सहचारी होते ।।''*

'मोक्ष' म्हणजे स्वतंत्रता अर्थात परब्रह्म अवस्था, मर्त्यतेतून 'मुक्ती' आणि उत्तम, उदात्त, उन्नत आणि महन्मधुर असे, ज्या अवस्थेचे वर्णन करावे लागते; ती अवस्था. 'सर्व सुखाचे आगर' म्हणजे 'मोक्ष'. 'मोक्ष' अवस्थेचे एवढे साक्षेपी व दिव्य वर्णन खचितच कोणी केले असेल. ही अवस्था, अशी स्थिती माणसाच्या अस्तित्वाला प्राप्त करण्यात यशस्वी होता येणे म्हणजे, 'मोक्ष' साधणे होय.

भारतीय तत्त्वज्ञानात मानवी जीवनाच्या यशस्वीतेची ही चवथी आणि अंतिम अवस्था होय. जेथे देहासह सर्व उपाधी गळून पडतात आणि उरतो फक्त 'सत्, चित्, आनंद' अर्थात केवलता. ऋषी, मुनी, तपस्वी, शास्त्रज्ञ, तत्त्वज्ञ, चिंतक, द्रष्टे प्रतिभावंत यांनी, ही 'मोक्ष' अवस्था प्राप्तीही माणसाला शक्य आहे; असे मार्गदर्शन केले. 'मोक्ष' अवस्थेला, जीवनकर्तव्यपर कर्ममार्गातील अंतिम पुरुषार्थ म्हणून संबोधले. 'मोक्ष' हे मानवाच्या यशस्वी जीवनसाधनेचे अंतिम लक्ष्य होय. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या पुरुषार्थ चतुष्टयातील अंतिम शिखर होय!

**१. तत्त्व आणि नीतिविचाराचे गृहितक :–**

भारतीय परंपरेत निष्पन्न होऊन सतत चिंतन प्रक्रियेत राहिलेले, तत्त्वज्ञान आणि अनुषंगिक वर्तनप्रणाली सूत्रे अर्थात नीतितत्त्वे जगाच्या इतिहासात अतिप्राचीन मानली जातात. अर्थातच तत्त्वज्ञानाचा सूक्ष्मातिसूक्ष्म विचार आणि विकास भारतीय परंपरेत सर्वाधिक झाला. विविध प्रकारचे तत्त्वज्ञान भारतात स्फुरले, विकसित झाले, परंपरास्थित झाले. 'मोक्ष' या अध्यात्मिक पारिभाषिक शब्दाला पर्यायी शब्द म्हणून 'मुक्ति' हा शब्द वापरतात. 'मोक्ष किंवा मुक्ति परमपुरुषार्थ होय. हे सर्व तत्त्वविचाराचें आणि नीतिविचाराचें गृहितक होय. मोक्ष किंवा मुक्ति या शब्दांचा अर्थ मोकळीक, सुटका, बंधनाश असा होतो. तेव्हा मोक्षाचे इष्टत्व मान्य करावयाचे असेल तर बंधाचे अस्तित्वही मान्य करावे लागेल' असे 'मराठी तत्त्वज्ञान – महाकोश' या कोशात नोंदविले आहे. अर्थात 'मोक्ष' किंवा 'मुक्ति' हा शब्द सापेक्ष आहे. ही सापेक्षता स्पष्ट करतांना कोशातील नोंदीत स्पष्ट केले आहे, 'मोक्ष म्हणजे जन्म-मृत्यूच्या संसारातून सुटका' अशी सुटसुटीत व्याख्या तयार होण्यामागे विचारांची आणखी एक साखळी आहे. जीवन जसे वासनामय आहे तसें कर्ममयही आहे. बुद्धिपुरस्सर आणि फलासक्तीपूर्वक ज्या कृती आपण करतों त्यांना कर्म म्हणावयाचे. प्रत्येक कर्माच्या ठिकाणी नैतिक बरेवाईटपणा हा असणारच. कर्माच्या बरेवाईटपणाचे रुपांतर काटेकोरपणे कर्मफलाच्या इष्टानिष्टतेंत होते. सृष्टींतील या सामंजस्याचें नांव 'कर्मसिद्धान्त' असे आहे. कर्माचे फळ हे मिळणारच.



हें फळ कृतक (कर्मजन्य) असल्यामुळे अशाश्वत असणार. अशाश्वत फळें शाश्वत कल्याणापासून व्यक्तीला वंचित करतात, म्हणजेच बंधनकारक ठरतात. अशा रीतीने कर्म हे बंधाला कारण होत असल्यामुळे आणि जन्मलेल्या व्यक्तीला कर्म अनिवार्य असल्याने अपुनर्भव (अ-पुनर् भव) म्हणजे 'मोक्ष' असे समीकरण रूढ झाले.' हे पाहिले तर जन्मोजन्मोंची ही जन्ममृत्यूची बद्धता नष्ट होणे म्हणजे 'मोक्ष' होय. 'देवाच्या दारी विसावा पुनरजन्म नसावा' असे सहज पालुपद देवाच्या पायरीवर बसले की माणसाच्या ओठातून स्फुट होते, हे भारतीयांच्या अंगवळणी पडले आहे. याचाच अर्थ मानवी जीवनात जन्ममृत्यू फेऱ्यातून सुटका म्हणजे 'मोक्ष' प्राप्ती असे मानणे होय. म्हणजेच माणसाचे अंतिम लक्ष्य किंवा ध्येय म्हणजे जन्ममृत्यू फेऱ्यातून, शरीराश्रयी अवस्थेतून बाहेर पडणे एवढेच नव्हे तर शाश्वत चैतन्यशाली अवस्थेत जाणे होय.

**२. उपनिषदांत केलेला मोक्ष किंवा मुक्तीचा विचार :–**

१) ईशावास्योपनिषदात 'मोक्ष' म्हणजे ज्ञानमय अवस्था होय असा आशय प्रतिपादला आहे. या उपनिषदामधील पहिल्या आठ मंत्रांत 'मोक्ष' अवस्था प्राप्त 'ज्ञानी' विभूतिमत्वाचे वर्णन ते असे-

*ॐ । ईशा वास्यमिद्ँसर्वं यत्किंञ्च जगत्यां जगत् ।*
*त्येन त्यक्तेन् भुञ्जीथा मा गृधः कस्य स्विद्धनम् ।।१।।*

अर्थात या जगात असलेले सर्व काही ईश्वराने आच्छादित करावे. 'सत्य' या परमार्थरूपाने चराचर झाकून टाकावे. सर्व विकारजात आत्मरूप आहे, अशी भावना करावी. त्यामुळे सर्वत्यागाची भावना परिपूर्ण होते. त्यागभावनेने आकांक्षा नष्ट होते. आत्मज्ञाननिष्ठ होऊन आत्म्याचे रक्षण करावे. 'मोक्ष' अवस्था ही ज्ञानमय अर्थात संन्यास अवस्था होय. संन्यासी धन, दारा, पुत्र आदि सर्व प्रकारच्या ऐहिकतेचा त्याग करतो म्हणजे मोक्ष पावतो किंवा त्यास मुक्ति अथवा ज्ञानमय अवस्था प्राप्त होते.

*कुर्वन्नेवेह कर्माणि जिजिविषेच्छत्ँसमाः ।*
*एवं त्यवि न्याय येतोऽस्ति न कर्म लिप्यते नरे ।।२।।*

या लोकी शंभर वर्षे जगण्याची इच्छा करावी ती केवळ अग्निहोत्रादि कर्मे

करण्यासाठी त्यामुळे अशुभकर्मे होत नाहीत व कर्माने लिप्त होणार नाही असे घडते. अर्थातच 'मोक्ष' प्राप्तीसाठी कर्मलिप्तता होऊ देता कामा नये. अर्थातच निष्काम कर्मयोग पालन आवश्यक आहे.

*असुर्या नाम ते लोका अन्धेन तमसा ऽऽ वृताः ।*
*तो्ँस्ते प्रेत्याभिगच्छन्ति ये के चात्महनो जनाः ।।३।।*

अज्ञानाने आच्छादित लोक जन्ममृत्यूच्या अर्थात पुनर्‌जन्मांच्या फेऱ्यात अडकतात. अज्ञान म्हणजे आत्म्याचे हनन व वासनांचे पोषण. या अज्ञानाचा त्याग कर्मविषयक अलिप्ततेच्या अभ्यासाने होतो. असा त्याग साधला की ज्ञान प्रकाशमान होते आणि ज्ञानी जीवनमुक्त होतो. म्हणून अज्ञानाचा नाश म्हणजे आत्म-ज्ञान होय.

*अनेकदेकं मनसो जवीवो नैनद्देवा आप्नुवन्पूर्वमर्षत् ।*
*तद्धावतो ऽ न्यानत्येति तिष्ठत्तस्मिन्नपो मातरिश्वा दधाति ।।४।।*

आत्मन् अर्थात आत्मतत्त्व आपल्या स्वरूपापासून कधीही च्यूत होणारे मनाहूनही अधिक वेगवान अस्तित्व आहे. ते इंद्रियांना लिप्त नाही. कारण ते मूळ तत्त्व आहे. ते शारीर अस्तित्वाचे उल्लंघन करून जाते. ते वाणीच्या पलिकडील तत्त्व आहे.

*तदेजति तन्नैजति तद्‌दूरे तद्वन्तिके ।*
*तदन्तरस्य सर्वस्य तदु सर्वस्वास्य बाह्यतः ।।५।।*

ते आत्मतत्त्व सद्रुप अवस्थेत विद्यमान असतांना उपाधींमुळे (शरीरामुळे) चंचल असल्यासारखे वाटते. परंतु ते विभु असल्याने अर्थात मुळात मुक्त असल्याने अचल असते. या आत्मतत्त्वाचे ज्ञान विद्वानांना होते. सर्व चराचराच्या अंतर्यामी आणि बाहेर सर्वत्र तेच भरलेले असून ते नित्य, निर्लेप, विधिनिषेधशून्य व जीवनमुक्त आहे. ह्या आत्मस्वरूपाचे ज्ञान म्हणजेच 'मोक्ष' होय.

*वस्तु सर्वाणि भूतान्यात्मन्येवानुपश्यति ।*
*सर्व भूतेषु चात्मानं ततो न विजुगुप्सते ।।६।।*

ज्ञानी अर्थात संन्यासी मुमुक्षु सर्व भूतमात्रात आत्मतत्त्व सामावल्याचा व सर्व भूतमात्र आत्मतत्त्वात सामावल्याचे अनुभवतो. त्यामुळेच तो लोकांमधील घृणा, निंदा, लोभ, मोह, मत्सर आदींपासून आपसूकच अलिप्त अर्थात मुक्त होतो.

*यस्मिन्त्सर्वाणि भूतान्यात्मैवाभूद्विजानतः ।*

ज्ञानी पुरुषाला सर्व भूते आत्मतत्त्वच झाल्याचा अनुभव येतो. तो सर्वत्र एकच मूळ आत्मतत्त्व अनुभवतो. स्वाभाविकपणे तो सापेक्ष सुख दुःख यांपासून मुक्त होतो असे पाहतो व आत्मस्वरूप होतो.

*स पर्यगाच्छुक्रमकायव्रणमस्नाविरं्ँशुद्धमपापविद्धम् ।*
*कविर्मनीषी परिभूः स्वयम्भूर्याथातथ्यतोऽन्व्यदधाच्छाश्वतीभ्यः*
*समाभ्यः ।।८।।*

आत्मन् सर्वत्र व्यापलेला, लिंगशरीररहित अक्षत, स्थलशरीर नसलेला अविद्या, अधर्म पाप यांपासून मुक्त असतो. म्हणूनच तो सर्वश्रेष्ठ, स्वयंभू, नित्य मुक्त असतो व तो प्रजापतींना कर्तव्यविषयक विभाग करून देतो. या आत्मतत्त्वाशी एकरूप होऊन असणे म्हणजे मोक्ष प्राप्ती होणे होय.

या सर्व औपनिषदिक विवेचनाचा अर्थ असा की 'मोक्ष' अवस्था म्हणजे परमात्मतत्त्वाचे जीवात्म्याचे ठिकाणी परिपूर्ण ज्ञान होऊन परमात्मस्थिती ज्ञानात्मकतेने 'याची देही याची डोळा' अनुभवता येणे. देही असूनही ऐंद्रियभावनांचा त्याग घडविता येणे, विदेही होऊन देही अनुभवता येणे, वासनादेहातून अलिप्त होणे होय. 'मृत्यू' हे यांवरील अंतिम उत्तर नव्हे. म्हणूनच मृत्यू म्हणजे 'मोक्ष' किंवा 'मुक्ती' नव्हे. मात्र सामान्यता 'सुटला' असे म्हणून लौकिकदृष्ट्या मृत्यूलाच 'मोक्ष' किंवा 'मुक्ती'ची अवस्था मानले जाते. मात्र वासनामयता, माया या मानसिक व देहिक विकारजन्य अवस्थांचा त्याग मृत्यूने घडेलच असे नाही. 'मोक्ष' संकल्पनेत पंचभौतिक वासनादेहात राहूनही त्यापासून अलिप्त होणे व मनासह इंद्रियांना आत्मतत्त्वाच्या चैतन्यशालीत्वाने अस्तित्व आहे हे जाणून त्या वासनादेहाचा त्याग आत्मानुभूती प्रसंगी करता येणे म्हणजे 'मोक्ष' हाच संन्यास अर्थात मुक्त न्यास. या अवस्थेनंतरही 'ज्ञानोत्तर भक्ती' स्वरूपात लौकिकात वावरता येते; ते परमात्मतत्त्वाच्या स्वरूपाप्रमाणे अलिप्त भावनेने. हेच मोक्ष अवस्थेचे भोगणे होय. याची देही परब्रह्मसुखाचा

अनुभव घेता येणे म्हणजेच 'अद्वैत' अवस्था भोगणे, परिपूर्णतेचा, निखळतेचा, मूळ कारणाचा अनुभव घेणे होय. म्हणूनच या उपनिषदाचा 'शांतीमंत्र' त्रितापासून मुक्ततेचा मंत्र होय–

*ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात्पूर्णमुदच्यते ।*
*पूर्णस्य पूर्णमादाय पूर्णमेवावशिष्यते ।।*
*ॐ शांतिः शांतिः शांतिः ।।*

'मोक्ष' किंवा 'मुक्ति' विषयक अशाच आशयाचे स्पष्टीकरण अन्य उपनिषदांमध्ये 'मोक्ष' किंवा 'मुक्ति' विषयक भाष्य करतांना आले आहे. उदा.– याज्ञवल्क्य आणि जनक यांच्यात 'ब्रह्म' किंवा 'मोक्ष' विषयक चर्चा घडतांना याज्ञवल्क्य म्हणाले,

*तस्य प्राची दिक्प्राश्चः प्राणा दक्षिणा दिग्दक्षिणे प्राणाः*
*प्रतीची दिकप्रत्यश्चः प्राणा उदीची दिगुदश्चः प्राणा उर्ध्वा*
*दिगूर्ध्वाः प्राणा अवाची दिगवाश्चः प्राणाः सर्वादिशः सर्वेप्राणाः ।।*
*स एष नेति नेत्यात्माऽगुह्यो न हि गुह्यते ऽ शीर्योन हि*
*शीर्यते ऽ सङ्गो न हि सज्यते ऽ सितो न व्यथते न रिष्यत्यभयं*
*तत्र को मोहः कः शोक एकत्वमनुपश्यतः ।।७।।*
*वै जनक प्राप्तोऽसीति होवाच याज्ञवल्क्यः ।।*
*स होवाच जनको वैदेहो ऽ भयं त्वा*
*गच्छताद्याज्ञवल्क्य यो नो*
*भगवन्नभयं वेदयसे नमस्ते ऽ स्त्विमे विदेहा अयमहमस्मि ।।४।।*

बृहदारण्यकोपनिषदाच्या चवथ्या अध्यायातील द्वितीय ब्राह्मणात हा अखेरचा चवथा श्लोक होय. या श्लोकाचा आशय असा– तैजसासहृदयात्म्यास वैश्वानरापासून लाभलेल्या व हृदयात्म्यापासून प्राणात्म्यास मिळालेल्या त्या ज्ञानाच्या दृष्टीने, विद्वानास पूर्व, दक्षिण, पश्चिम, उत्तर, उर्ध्व व अधर दिशा हे त्या त्या दिशेचे प्राण होत. अर्थात सर्व दिशांतील जे चैतन्य किंवा जिवंतपण ज्ञानी अनुभवतो ते तेथील प्राण होत. त्या प्राणांचे अस्तित्व ज्यापासून जाणवते त्या आत्म्याचे अस्तित्व



मात्र 'नेति' या शब्दाने वर्णन करावे लागते व तसेच केलेले आढळते. कारण आत्मा ग्रहण करता येत नाही, त्याचा नाश होत नाही, तो आसक्त होत नाही, तो बद्ध होत नाही व त्याला व्यथाही नाही, त्याची हिंसा होत नाही. असा तो असल्याने त्या आत्म्याचे ज्ञान झाल्याने जनक जीवनाच्या बाबतीत विदेह असा निर्भय झाला. जनक याज्ञवल्क्यांना म्हणाले, आपण आम्हाला अभयब्रह्माला पोचवित आहात म्हणून आपणास ही निर्भयता आत्मस्वरूप प्राप्त होवो. म्हणूनच मी स्वतः, हा देहही आता आपल्या अधीन आहे.

लिप्ततेने भयग्रस्तता येते. या लिप्ततेचा त्याग केला की निर्भयावस्था प्राप्त होते. ही निर्भयावस्था म्हणजे 'मोक्ष' अथवा पूर्ण ज्ञान, ब्रह्मज्ञान होय. सूर्याला अंधार सापडत नाही तसे 'मोक्ष' लाभ झाला की भय राहात नाही.

अशाच आशयाची चर्चा तैत्तिरीयोपनिषदात ब्रह्मवल्यध्यायात प्रथम श्लोकात येते –

*ॐ ब्रह्मविदाप्नोति परम् । तदेषा ऽ भ्युक्ता ।*
*सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म । यो वेद निहितं गुहायां परमे व्योमेन् ।*
*सोऽश्नते सर्वान्कामान्त्सह । ब्रह्मणा विपश्चितेति ।।*

'ब्रह्म' हे सत्य, अव्यभिचारी, अबाधित स्वरूप आहे. ते ज्ञानात्मक, बोधात्मक अर्थात अनुभवात्मक आहे. ते चेतन, अन्तरहित, अखंड, निर्विकार आहे याचे ज्ञान ज्या ज्ञानी माणसाला होते म्हणजे जो मोक्षपदी जातो तो सर्व प्रकारच्या कामांना (वासनांना) भोगांना एकाच वेळी – एका क्षणांतच जाणतो, भोगतो. म्हणजेच 'मोक्ष' किंवा 'मुक्ति' पदी पोचलेल्या अर्थात पूर्ण ज्ञानी माणसाला संपूर्ण आनंद प्राप्त होतो अर्थात तो सत् चिद् आनंद भोगतो.

उपनिषदांनी प्रत्यक्ष पूर्णज्ञानप्राप्तीला मोक्ष प्राप्ती असे मानले आहे. ज्ञानमय अवस्था 'अमृतत्वं गच्छति' अशी असते.

**३. मध्ययुगीन संतांचा ''मोक्ष' किंवा मुक्ती विचार :–**

महाराष्ट्रात भागवत अथवा वैष्णव संप्रदायाची परंपरा खूप मोठी

आहे. वेदप्रामाण्य आणि पुरुषार्थ चतुष्टय मानणाऱ्या या संप्रदायाने मोक्ष अर्थात मुक्तिसाधनेचा मार्ग लोकनिष्ठेने, ज्ञानोत्तरभक्ती स्वरूपात सर्वांसाठी प्रशस्त केला. स्वाभाविकपणे श्री संत ज्ञानेश्वर हेच या मार्गाचे उद्गाते होत. मोक्षप्राप्तीचे श्री ज्ञानेश्वरांनी सूत्र सांगितले. हरिपाठाच्या अभंगात 'परवलीच्या शब्दा'प्रमाणे भागवत सांप्रदायिक त्याचा नित्यपाठ करतात.

*'भावेवीण भक्ति, भक्तिवीण मुक्ति ।*
*बळेवीण शक्ती बोलूं नये ।।१।।*
*कैसेनि दैवत प्रसन्न त्वरित ।*
*उगा राहे निवांत शिणसी वाया ।।२।।*
*सायास करिसी प्रपंच दिननिशीं ।*
*हरीसी न भजसी कोण्यागुणे ।।३।।*
*ज्ञानदेव म्हणे हरिजप करणें ।*
*तुटले धरणे प्रपंचाचें ।।४।।'*

संतांच्या मताप्रमाणे 'मोक्ष' किंवा 'मुक्ती'ची अनुभूती म्हणजे 'अद्वैत' अनुभूती होय. ही अनुभूती भक्तिसाधनेने, द्वैति राहून याचि देही याचि डोळा भोगता येते. श्री निवृत्तीनाथांपासून श्री तुकारामांपर्यंत आणि या परंपरेतील सर्वांनीच 'मुक्ती'ची अनुभूती अवस्था मान्य केली आहे.

श्री संत निवृत्तीनाथ म्हणतात–

(१) *अनंत ब्रह्मांडे अनंत रचना ।*
*शून्य ते वासना तेथे जाली ।।१।।*
*मन गेलें शून्यीं ध्यान ते उन्मनी ।*
*चित्त नारायणीं दृढ माझें ।।२।।*
*तेथें नाहीं ठावो वेदासि आश्रयो ।*
*लोपले चंद्र सूर्य नाही सृष्टीं ।।३।।*
*निवृत्तिं म्हणे तो ठाव मज पैठा ।*
*नेतसे वैकुंठा गुरुनामें ।।४।।*

(२) *खुंटलें तें मन तोडियेली गति ।*
*वेळू तो पुढती मोडियला ।।१।।*
*जाहलें उन्मन विरालें तें मन ।*
*श्रीरामचरण पुरे आम्हां ।।२।।*
*गेलें मन रामीं निष्काम कल्पना ।*
*बुडाली वासना तिये डोहीं ।।३।।*
*धन्य ते चरण नित्यता स्मरण ।*
*अखंडसंपन्न प्रेम देतु ।।४।।*
*अमृत कुपिका अमृताचा झरा ।*
*पाहु एकसरा वाहातुसे ।।५।।*
*निवृत्तीची वृत्ती प्रेमेंचि डुल्लत ।*
*नमनें निश्चित रामपायीं ।।६।।*

(३) *प्रपंच टवाळ वृक्षाचें फळ ।*
*उपटिले मूळ कल्पनेचें ।।१।।*
*गेली ते वासना निमाली भावना ।*
*चुकलें बंधना यमपाश ।।२।।*
*उपजत मूळ खुंटलें तें जाळ ।*
*मायेचे पडळ हरपलें ।।३।।*
*निवृत्तिस्वानंद नित्यता आनंद ।*
*जग हा गोविंद आम्हां पुरे ।।४।।*

(४) *परिपूर्ण ब्रह्म विज्ञानेंसि ज्ञान ।*
*योगियाचें ध्यान आत्मज्योति ।।१।।*
*आत्माराम सार दृश्य द्रष्टा विचार ।*
*नाम संकेत धीर निरंतर ।।२।।*
*ध्येयाचें पै ध्यान मनाचें उन्मन ।*
*भक्तांसी पावन वैकुंठीचें ।।३।।*

*निवृत्ति म्हणे भक्ता स्वानंद जीवन ।*
*ब्रह्मसनातन सर्वांघरी ।।४।।*

जीवनातील मार्गक्रमण करतांना अध्यात्माचा आनंद भोगण्याची अर्थात 'मोक्ष' हा पुरुषार्थ साधण्याची गुरुकिल्लीच भागवत संतांनी प्रबोधित केली.

श्री संत ज्ञानेश्वर म्हणतात–

(१) *मजमाजी पांहतां मीपण हारपलें ।*
*ठकलेंचि ठेलें सये मन माझें ।।१।।*
*आंत विठ्ठलु बाहेर विठ्ठलु ।*
*मीचि विठ्ठलु मज भासतसे ।।२।।*
*मीपण माझे नुरेचि कांहीं दुजें ।*
*ऐसे नाही केले निवृत्तीराजें म्हणे ज्ञानदेवो ।।३।।*

(२) *विश्वाचे आर्त माझे मनीं प्रकाशले ।*
*अवघेंचि जाले देहब्रह्म ।।१।।*
*आवडीचें वालभ माझेनी कोंदाटलें ।*
*नवल देखिले नभाकार गें माये ।।२।।*
*बापरखुमादेविवरू सहज निटू जाला ।*
*ह्रदयीं नटावला ब्रह्माकारे ।।३।।*

(३) *अनुभव जाला प्रपंच बुडाला ।*
*आपुला आपण देखिला सोहळा वो माये ।।१।।*
*आपण जाणतां आपण मी जालिये ।*
*आपणापैं विसरलिये नेहटीं वो मायें ।।२।।*
*आपुला म्हणोनि अवघा आलिंगिला ।*
*अवघा देखिला अवघेपणें वो माये ।।३।।*
*ऐसें जाणोनि ठकले ठकोनियां ठेलें ।*
*रखुमादेविवरे विठ्ठलें वो मायें ।।४।।*



(४) *आम्ही संन्यास घेतला ।*
*देहादिकांचा त्याग केला ।।१।।*
*आम्ही संन्यासी संन्यासी ।*
*सदा राहों एकांतेसी ।।२।।*
*चित्तचतुष्टया निरसिलें ।*
*अज्ञाना तिलोदक दिधलें ।।३।।*
*ज्ञानाचे विज्ञान आले हातां ।*
*आम्हां नाहीं शरीर ममता ।।४।।*
*ब्रह्माहमस्मि शुद्धज्ञान ।*
*तेथील सांडिला अभिमान ।।५।।*
*बापरखुमादेविवरु विठ्ठलु ह्रदयीं ।*
*तोचि सबाह्य अभ्यंतर ठाई असे राया ।।६।।*

श्री संत ज्ञानेश्वर अवस्थेचे वर्णन करतात. त्याचबरोबर 'त्यागा'ची महती व परिणती वर्णन करतात. एक प्रकारे मोक्षाचे विज्ञान स्पष्ट करतात.

नवविधाभक्तिमार्ग अखेर आत्मज्ञानप्राप्ती घडविते. अर्थात भक्ती हाच मोक्षमार्ग होय असे सांगून 'मोक्ष' म्हणजेच आत्मज्ञान होय. 'आत्मज्ञान' अनुभूती अवस्था स्पष्ट करतांना श्री संत नामदेव म्हणतात–

(१) *आत्मत्वाच्यायोगें पाहूं जातां ।*
*नाहीं निरंतर भिन्नदेवता ।।१।।*
*वर्णाश्रम याति कुळ गोत्र ।*
*भक्ति सदोदित नामापाशी ।।२।।*
*नामा म्हणे भय मुळीं कांहीं नाही ।*
*अखंडित पाही भक्तिसार ।।३।।*

(२) *आतां मज भय नाहीं पै कणाचें ।*
*जन्ममरणाचें दुःख गेलें ।।१।।*
*बद्ध मोक्षाची फिटली काजळी ।*
*समाधि लागली समाधीसी ।।२।।*

*नामा म्हणे सर्वही साधन ।*
*खेचर चरण न विसंबे ।।३।।*

'मोक्ष' अथवा 'मुक्ति' हा पुरुषार्थ साध्य करायचा असेल तर भावभक्तीबरोबरच श्री सद्‌गुरुकृपा सर्व संतांनी महत्त्वाची व अपरिहार्य मानली आहे हेही या उल्लेखांवरून स्पष्ट होते.

(३) *हरिकथा ऐकतां अनन्य पैं गोष्टी ।*
*निधान त्या दृष्टी अंतरलें ।।१।।*
*घडी घडी प्रेम अंतरूं न द्यावें ।*
*सावधान व्हावे रामनामीं ।।२।।*
*यापरी स्वहितीं ठेवियलें लक्ष ।*
*ते पावती मोक्ष म्हणे नामा ।।३।।*

भावभक्तीमुळे मोक्षमुक्ती सहज प्राप्त होते. मोक्षपदी पोचविण्याची कृपा पांडुरंग करतो असा भाव भागवत संतांचा आहे.

श्री संत एकनाथ महाराज म्हणतात–

(१) *आम्हां तुमचा भरंवसा ।*
*सांभाळावें जगदीशा ।।१।।*
*आपुली आपण जतन करा ।*
*ब्रीदावली हे दातारा ।।२।।*
*आम्ही पतितांनी कोडें ।*
*तुम्हां घातलें सांकडे ।।३।।*
*शरण एका जनार्दनी ।*
*मोक्षमुक्ती तुमचे चरणी ।।४।।*

(२) *ओळखिला हरि धन्य तो संसारी ।*
*मोक्ष त्याचे घरी सिद्धिसहित ।।१।।*
*एका जनार्दनी नाही यातायाती ।*
*सुखाची विश्रांती हरिसंगे ।।५।।*



(३) *जें जें दृष्टी दिसे तें तें हरिरूप ।*
*पूजा ध्यान जप त्यासी नाहीं ।।१।।*
*वैकुंठ कैलासीं तीर्थक्षेत्रीं देव ।*
*तयाविण ठाव रिता काठें ।।२।।*
*वैष्णवांचे गुह्य मोक्षाचा एकांत ।*
*अनंताचा अंत पाहतां नाही ।।३।।*
*आदि मध्य अंतीं अवघा हरि एक ।*
*एकचि अनेक एक हरि ।।४।।*
*एकाकार झाले जीव तैचि दोन्ही ।*
*एका जनार्दनी ऐसें केलें ।।५।।*

सद्‌गुरुकृपेमुळे मोक्ष, मुक्ती सहज आहे असे ते स्पष्टपणे सांगतात.

(४) *धन्य धन्य श्रीगुरुभक्त ।*
*गुरुचे जाणते मनोगत ।।१।।*
*गुरुचरणी श्रद्धा गाढी ।*
*गुरुभजनाची आवडी ।।२।।*
*गुरुचें नाम घेता वाचें ।*
*कैवल्य मुक्ति तेथे नाचे ।।३।।*
*गुरुचे घेता चरणतीर्थ ।*
*भुक्तिमुक्ति पवित्र होत ।।४।।*
*गुरुकृपेचे महिमान ।*
*शरण एका जनार्दन ।।५।।*

जगद्‌गुरू संत तुकाराम तर मोक्षसाधना अर्थात मोक्ष पुरुषार्थ भक्तीची सहजस्थिती आहे असे निक्षून सांगतात. भक्ती करण्याची संधी सर्वात महत्त्वाची. त्यामुळे 'अद्वैत' सुखाचा 'मोक्ष' अवस्थेचा आनंद सहज याचि देही याचि डोळा शक्य आहे.

श्री तुकाराम म्हणतात–

(१) *मोक्षाचें आम्हांसी नाहीं अवघड ।*
*तो असे उघड गांठोळीस ।।१।।*

*भक्तीचे सोहळे होतील जीवासी ।*
*नवल तेविशीं पुरविता ।।२।।*
*ज्याचें त्यासी देणें कोणतें उचित ।*
*मानूनियां हित येतों सुखें ।।३।।*
*तुका म्हणे सुखें देईं संवसार ।*
*आवडीसी थार करीं माझे ।।४।।*

मोक्षसाधना आणि मोक्षानुभूती ही भक्तिरूपच असल्याचा निर्वाळा देवून, अनन्य, निःस्सीम भक्ती म्हणजेच 'मोक्ष' किंवा 'मुक्ति' होय असे तुकाराम महाराज निर्णायकपणे म्हणतात. म्हणूनच श्री तुकाराम महाराज 'मोक्ष' या गोष्टीची गरजच नाही असे निक्षून सांगतात–

(२) *मोक्ष देवापाशीं नाही ।*
*लटक्या घाई विव्हळत ।।१।।*
*काय खरं न धरी शुद्धी ।*
*गेली बुद्धी भ्रमलें ।।२।।*
*अहंकारा उरलें काई ।*
*पांचां ठायीं हें वाटे ।।३।।*
*तुका म्हणे कुंथे भारें ।*
*लटिकें खरे मानुनिया ।।४।।*

(३) *मोक्षपद तुच्छ केलें याकारणें ।*
*आम्हा जन्म घेणें युगायुगीं ।।१।।*
*विटे ऐसे सुख नव्हे भक्तिरस ।*
*पुढतापुढती आस सेवावें हें ।।२।।*
*देवा हाती रूप धरिला आकार ।*
*नेदूं निराकार होऊं त्यासी ।।३।।*
*तुका म्हणे चित्त निवांत राहिलें ।*
*ध्याईं तीं पाउलें विटेवरी ।।४।।*

म्हणून श्री तुकाराम महाराज देवाला सांगतात–



(४) *मोक्ष तुमचा देवा । तुम्ही दुर्लक्ष तो ठेवा ।।१।।*
*मज भक्तीची आवडीं । नाहीं अंतरी ते गोडीं ।।२।।*
*आपल्या प्रकारा । करा जतन दातारा ।।३।।*
*तुका म्हणे भेटीं । पुरे एकचि शेवटी ।।४।।*

पुरुषार्थ चतुष्टय ही मानवी जीवनसारणीची आदर्श अवस्था आहे असे संतांना वाटत होते. या आदर्श सारणीचा कणा श्रद्धा आणि भक्ती हा आहे. कारण भक्तिभावनेत निर्मळ आनंदप्राप्तीसाठी सर्व समर्पणाचा भाव आहे. निष्कामकर्मपरता सामावली आहे. धर्मपालन, कामजीवन आणि अर्थव्यवहार हा केवळ कर्तव्यभावे करावयाचा उपचार राहतो. हा सर्व व्यवहार सत्‌चिद्‌आनंदार्पण करावयाचा असतो. संसाराची अशी असारता ज्ञानात्मक व्यवहारात अभिप्रेत असते हे संतांनी आपल्या उक्ती आणि वर्तनातून प्रबोधित केले आहे. त्यामुळे निष्कामतेत मोक्ष, मुक्ति नित्य असते. याचा वस्तुपाठ भागवत संतांनी दिला. श्री संत नामदेव, श्री संत एकनाथ, श्री संत तुकाराम आणि त्यांच्या समकालीन प्रभावळीतील संतांनी 'प्रपंच करावा नेटका' या सूत्राचा व्यवहार केला. 'नेटका' याचा अर्थ कर्तव्यभावाने, निरासक्त तत्परतेने आणि निर्भयतेने 'सत्‌चिद्‌आनंदकार्य' म्हणून करावयाचा हे सांगितले म्हणून अवघा संसार सुखाचा अर्थात मोक्षस्वरूप झाला हे लक्षात घ्यायला हवे.

**श्री संत रामदासांच्या दासबोधातील 'मोक्षलक्षण' :–**

दासबोधातील आठव्या दशकातील सातव्या समासात 'मोक्षलक्षण' विचार रामदासांनी मांडला आहे. प्रापंचिक माणसाची अवस्था आणि 'मोक्ष' पुरुषार्थ या दृष्टीने हे विवेचन आलेले असल्याने त्यांस विशेष महत्त्व आहे. रामदास म्हणतात–

*'तरी बद्ध म्हणिजे बांधला ।*
*आणि मोक्ष म्हणिजे मोकळा जाला ।*

'मोक्ष' विचारात 'आत्मतत्त्व' विचार मुलभूत आहे. तो विचार रामदास सांगतात–

*'दृश्य सबाह्य अंतरी । सूक्ष्मात्मा निरंतरं ।*

*त्याची वर्णावया थोरी । शेष समर्थ नव्हे ।।५४।।*
*ऐसे आत्म्याचें लक्षण । जाणतां नाहीं जावपण ।*
*उपाधी शोधिता अभिन्न । मुळींच आहे ।।५५।।*
*जीवपणें येकदेसी । अहंकारें जन्म सोसी ।*
*विवेक पाहाता प्राणीयांसी । जन्म कैंचा ।।५६।।*
*जन्ममृत्यापासून सुटला । या नाव जाणिजे मोक्ष जाला ।*
*तत्त्वें शोधितां पावला । तत्त्वता वस्तु ।।५७।।*
*तेचि वस्तु ते आपण हें माहावाक्याचें लक्षण ।*
*साधु करिती निरुपण । आपलेन मुखें ।।५८।।*
*जेचि क्षणी अनुग्रह केला । तेचि क्षणीं मोक्ष जाला ।*
*बंधन कांही आत्मयाला । बोलोंचि नये ।।५९।।*
*विवेक पाहिल्याविण । जो जो उपाव तो तो सीण*
*विवेक पाहतां आपण । आत्माच असे ।।६५।।*
*आत्मयाचा ठाई कांही । बद्ध मोक्ष दोनी नाहीं ।*
*जन्ममृत्यू हें सर्वही । आत्मत्वीं न घडे ।।६६।।*

रामदास स्वामींनी मोक्ष पुरुषार्थ साधण्यासाठी गुरुपदेशासह विवेकविचार मांडला आहे. माणूस जीवपणानें एकदेशी बनतो, संकुचित होतो. मी देह आहे या अहंकाराने त्याला जन्म सोसावे लागतात. परंतु 'आत्म' विवेक केला तर मी देह नसून आत्माच आहे अशी खात्री होते. मग त्यास पुन्हा जन्म घ्यावा लागत नाही. जन्ममृत्यूच्या कचाट्यांतून जो सुटला त्यास मोक्ष मिळाला असे समजावे. येथे एक गोष्ट विचारात घ्यावी लागते; मध्ययुगीन संतांनी भक्तिअनुभूतीचा जो विचार सांगितला त्यातच 'विवेक' विचाराचे रहस्य दडले आहे. दुर्लभ नरदेहच भक्ती किंवा विवेक करू शकतो व मोक्षस्वरूप नित्य असा आत्मानंद भोगू शकतो.

**४. 'मोक्ष' हा परम पुरुषार्थ :–**

डॉ. किसनमहाराज साखरे संपादित 'विचार सागर रहस्य' ग्रंथात, पहिल्या तरंगात, 'मुमुक्षु लक्षण' या चर्चेत 'मोक्ष'पदाची व्याख्या केली आहे. ही सुटसुटीत व्याख्या संसारप्रापंचिकांसाठी सूचक आहे. ''ब्रह्मप्राप्ति आणि संसारबंधाची निवृत्ति यास 'मोक्ष' म्हणतात.'' या मोक्षाच्या तीव्र इच्छेस 'मुमुक्षुता' आणि ही मुमुक्षुता ज्यास असेल तो 'मुमुक्षु' होय अशी व्याख्यात्मक चर्चा केली आहे. विवेक, वैराग्य, शमादिषटक आणि मुमुक्षुता ही साधनचतुष्टय सारणी 'मुमुक्षु'ला अपेक्षित आहे. या साधनचतुष्टयाने 'मोक्ष' अनुभूती प्राप्त होते. असे 'मोक्ष' पुरुषार्थ साधनेचे सूत्र आहे.

प्रापंचिक किंवा संसारी; रोगक्षुधादिस्वरूपाच्या 'आध्यात्मिक', चोरव्याघ्रसर्पादिकांपासूनच्या 'आधिभौतिक' आणि यक्षराक्षसपिशाच्चशितवातादि पासूनचे आदिदैविक दुःख भोगण्यात बद्ध असतो. त्यातून सुटका व्हावी यात अडकलेल्या माणसाला मायामय, भ्रामक, मर्त्य, क्षणैक अशा अवस्था वस्तुतः अज्ञानमूलक असूनही खऱ्या वाटतात व माणूस मुमुक्षुताच स्वीकारीत नाही. त्यामुळे या परमपुरुषार्थाच्या जवळपासही फिरकत नाही. याशिवाय शारीर वासनामयता आणि सहजप्रवृत्ती यातच त्याचे मन गुंतून पडते. त्यामुळे मर्त्यतेच्या भयग्रस्ततेपलिकडे माणूस झेपावत नाही. या सर्व गोष्टींची निवृत्ती केवळ मुमुक्षुता प्राप्त झाल्याने व साधनचतुष्टयाने होते याकडे लक्ष वेधणे म्हणजे 'मोक्ष' या परमपुरुषार्थाकडे लक्ष जाणे होय. त्यासाठी आत्मस्वरूपाच्या अज्ञानाचा अर्थात शारीर अहंकारअस्तित्वस्वरूप खरे वाटणे या अज्ञानाचा नाश यथार्थ आत्मज्ञानाने म्हणजे अलिप्त केवळ सत्‌चिद्‌आनंद अशा ब्रह्मस्वरूप आत्मज्ञानानेच होईल. असा संदेश स्वीकारण्याची तयारी सद्‌गुरूसत्संग यातून होऊ शकते. केवळ 'स्मशान वैराग्याने' किंवा 'शब्दच्छलाने' नव्हे. मात्र प्रापंचिकांनी कर्म हेच 'मोक्ष'प्राप्तीचे साधन आहे हे लक्षात घेऊन; नित्य, नैमित्तिक काम्य आणि प्रायश्चित्त स्वरूपातील कर्म आणि पूर्वजन्मातील कर्मसंचित व प्रारब्धकर्म या सर्व कर्म प्रकारांचे त्यांना विवेकपूर्वक ज्ञान होणे आवश्यक असते. त्यासाठी सद्‌गुरू आवश्यक आहे.

सद्‌गुरूने जीवेश्वरांचा, जीवजीवांचा, जीवजडाचा, ईश्वरजडाचा आणि जडाजडाचा भेद स्पष्ट करून दुःखकारणांचे निराकरण करावे व संसारमिथ्यत्वाचे ज्ञान संज्ञापित करून अद्वितीय अशा ब्रह्माचें आत्मत्वानें प्रत्यक्ष ज्ञान घडवावे अशी अपेक्षा असते. याचा थेट अर्थ असा की,

परमपुरुषार्थाच्या वाटेवर सद्गुरू भेटणे आवश्यक आहे तरच बद्धअवस्थेच्या सर्व शंकांचे निरसन होऊन मोक्षसाधना घडेल.

मोक्षसाधना सद्गुरूसत्शिष्य यांच्या ज्ञानसंवाद प्रक्रियेतून भावात्मकतेने शक्य आहे. ही गोष्ट केवळ नरदेहातच शक्य आहे म्हणून माणसाने हा परमपुरुषार्थ साधावा, असे ब्रह्मज्ञानी प्रतिपादितात.

**५. भारतीय पुरुषार्थ मिमांसेत 'मोक्ष' किंवा 'मुक्ति' पुरुषार्थाचे स्थान :–**

धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या प्रसिद्ध पुरुषार्थ चतुष्टयात, अर्थ आणि काम हे व्यक्तिगत सुखसमाधान स्वास्थ्य याशी संबंधित आहेत. अर्थ हे साधन तर काम हे साध्य स्वरूप आहेत. जीवन स्थैर्य व विकास याशी त्यांचे नाते आहे. या दोन्ही पुरुषार्थांना 'धर्म' हा पुरुषार्थ नियंत्रित करतो. 'धर्म' म्हणजे नैतिक ध्येयबंधन होय. या पुरुषार्थाचा सांघिक सुख, स्थैर्य व विकास यांशी संबंध असून यासंबंधी नीतिशास्त्र उपयोजित करून संघमानसाची धारणा हे याचे साध्य असते. 'धारणात् धर्म इत्याहुर्धर्मो धारयते प्रजः' अशी या पुरुषार्थाची व्याख्या असून व्यक्ती व समूह अवस्थेत या पुरुषार्थाची साधना अपेक्षित आहे. या तीनही पुरुषार्थाचे स्वरूप ऐहिक जीवन किंवा भौतिकतः संसारप्रपंच स्वरूपाचे असते. यापलिकडे जाऊन सुख, शांती, आनंदप्राप्ती साधणारा पुरुषार्थ म्हणजे 'मोक्ष' हा पुरुषार्थ पारलौकिक स्वरूपाचा असून; पारलौकिकाचे अस्तित्व पहिल्या त्रिविध पुरुषार्थ साधनेत आत्मतत्त्वाच्या स्वरूपात असते हे ओळखून खरे अंतिम साध्य 'आत्मज्ञान' किंवा 'ब्रह्मज्ञान' होऊन 'सत्चिद्आनंदस्वरूप' अशा 'ज्ञानमय' अवस्था भोगणे हे 'मोक्ष' पुरुषार्थाचे साध्य आहे. त्याचाच अर्थ असा की अर्थ, काम व धर्म ही पुरुषार्थसाधना करीत असतांना 'पुरुष' म्हणजे 'आत्मा' हा साक्षी किंवा अलिप्त स्वरूपात कार्यरत असतो. त्यावर, जाणिवेचे लक्ष्य केंद्रित करून साधना करावी लागते म्हणजे ऐहिक भौतिक संसारप्रपंचाची भ्रामकता, क्षणभंगुरता, मर्त्यता, मिथ्यत्व किंवा वैयर्थता लक्षात घेऊन कर्म करण्याची अपेक्षा 'मोक्ष' साधनेत असते. त्यामुळे 'मोक्ष' हा पुरुषार्थ सर्वव्यापी आहे हे लक्षात घ्यावे लागते व मोक्षप्राप्ती अर्थात ब्रह्मस्वरूप होणे हे या पुरुषार्थाचे अंतिम साध्य असते.



याकरिताच पुरुषार्थ चतुष्टयात या पुरुषार्थाला परमपुरुषार्थ संबोधले आहे.

**६. भक्तिसंप्रदायातील मोक्ष किंवा मुक्तीचे प्रकार :–**

सलोकता, समीपता, सरुपता व सायुज्यता असे चार प्रकार भक्तिसंप्रदायात मोक्षसाधनेचे मानले जातात. खरेतर या मोक्षसाधनेच्या किंवा मुक्तिसाधनेच्या पायऱ्या आहेत. ब्रह्मलोक, आत्मलोक, आनंदलोक किंवा वैकुंठलोक यांत रममाण होणे म्हणजे स–लोकता, गोपीभावाने परमात्म्याजवळ राहणे म्हणजे समीपता, आराध्याशी एकरूप होणे म्हणजे सरुपता आणि स्वतःचे पृथकत्व अबाधित ठेवूनही ईश्वरात मिसळून जाणे म्हणजे सायुज्यता होय. यालाच याचि देही याचि डोळा परब्रह्मसुखसोहळा अनुभवणे असे म्हणतात.

संतपरंपरेतील संतांनी या चारही पायऱ्यांवरून मोक्ष किंवा मुक्तिसाधना केलेली दिसते. अशी चारही पायऱ्यांवरील मुक्ती किंवा मोक्षानुभूती अनुभवायची असेल तर 'पुरुष' या अस्तित्वाची अर्थात 'आत्मन्' अर्थात परमात्मन् या नित्य, निखळ, केवळ चैतन्यशाली मूलकारणाची जाणीव होणे आवश्यक असते. सद्गुरुकृपेने ऐहिक जीवनाच्या भ्रामकतेचे आणि आत्मविषयक नित्यतेची जाणीव होते. सत्संग घडला की परममुक्तीचे ज्ञान होते आणि भाव बळावतो. अर्थात श्रद्धा निर्माण होऊन स्थिरावते, भक्ती विकसित होते. भक्तिसाधनेने सलोकता, समीपता, सरुपता, सायुज्यता या चारही मुक्तींचा अनुभव घेता येतो. श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठात म्हणूनच सुरुवातीलाच 'मोक्ष' किंवा 'मुक्ति' या पुरुषार्थ साधनेची किल्ली सर्वसामान्यांना दिली आहे – ''देवाचिये द्वारी उभा क्षणभरी, तेणे मुक्ति चारी साधियेल्या''.

**७. 'मोक्ष' पुरुषार्थाची लोकनिष्ठ मिमांसा :–**

पुरुषार्थ साधना, त्यातही परमपुरुषार्थ अर्थात 'मोक्ष' साधना ही केवळ 'मुमुक्षु'साठीच आहे की सर्वसामान्य कुटुंबवत्सल प्रापंचिकांसाठी आहे असा प्रश्न मनात येतो. सद्गुरूशिवाय मोक्षसाधना नसेल तर सद्गुरू कोण? त्यांच्या जवळ जायचे कसे? हा प्रश्न निर्माण होतो. परंतु भगवत्गीतेने निष्कामकर्मयोगाच्या माध्यमातून याचे उत्तर दिले आहे. प्रापंचिकांना सर्वत्र दुःखाची अनुभूती येते. या दुःखावर मात करणे, दुःख परंपरेतून निसटणे

ही एक प्रकारे पुरुषार्थ साधनाच असते. 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग, अंतरबाह्य शरीर आणि मन' ही तुकोबारायांची उक्ती प्रापंचिकांसाठीच आहे. संघर्ष करीत प्रपंच पूर्ण करण्याचा प्रयत्न म्हणजे पुरुषार्थ साधना होय. 'पुरुष' म्हणजे 'आत्मन' हे अस्तित्व देहाच्या ठिकाणी जीवनप्रेरक असते मात्र ते अस्तित्व देहाला व वासनेला लिप्त नसते तर ते केवळ साक्षी असते हे लक्षात घेऊन, कोणत्याही कर्मसाधनेने पश्चात्तापाची पाळी येणार नाही याचा विवेक करता येणे ही पुरुषार्थ साधनेची पहिली पायरी होय. 'विवेक' असला तरच निर्भयता, त्याग सहज साध्य आहे. पुरुषार्थ साधनेच्या या अटी धर्म पुरुषार्थाने अंगवळणी पडतात. कारण समूहजीवनातील नैतिकता तेथे पुरुषार्थप्रवण असते. प्रपंचातील आसक्तींची वैयर्थता कळायला ती साधनीभूत ठरते. याकरिता प्रापंचिकांना सुलभतेने पुरुषार्थ साधना करून दुर्लभ अशा नरदेहप्राप्तीचे सार्थक करता यावे यासाठी तर श्रीमद् नारदमुनींनी भक्तिसाधना उपयोजित करून परंपरेत आणली. भक्तिसाधनेत आपसुकच विवेक, ज्ञान, वैराग्य अभिप्रेत आहे. बद्धतेतून त्यागपूर्वक आणि प्रेमपूर्वक सुटका करण्याचा सुलभ मार्ग म्हणजे भक्ती होय. म्हणूनच नवविधा व तत्सम पंचविधा अनेकविधा भक्तीचे सूचन करून नारदीय परंपरेने प्रापंचिकांसाठी पुरुषार्थ साधनेचा मार्ग प्रशस्त केला. भागवत संतपरंपरेने तर एकप्रकारे यासंदर्भात क्रांतीच घडविली. नैतिक मर्यादा, संयम, त्याग, सत्यनिष्ठा आणि सर्वाभूती प्रेममयता यामुळे अर्थ, काम, धर्मसाधना होऊन मुमुक्षुता निर्माण होते आणि प्रपंचातही परमार्थ साधना घडते. म्हणूनच 'बैसुन व्यवहारी जिव्हे वेध करी'चा संदेश दिला जातो आणि 'मोक्ष' अथवा मुक्तीच्या समीप प्रापंचिकांनाही जाता येते. माणूस म्हणून जन्माला आलेल्या प्रत्येकाने पुरुषार्थ प्रवण व्हावे हीच धुरीणांची अपेक्षा आहे. हीच तत्त्वज्ञानाची साधनामार्गाची लोकनिष्ठा होय. 'मोक्ष' किंवा 'मुक्ती' या चर्चेने 'आत्मज्ञान'विषयक अद्भुतता अथवा साधना काठिण्य संपवून सहज मोक्षसाधना भक्तीने होते; हेच यातून संज्ञापित होते. परतत्त्वज्ञान हे सर्वांसाठी नेहमीच खुले असते. कारण त्या परमात्मतत्त्वाचे अस्तित्व सर्वांठायी आहे आणि सर्व त्या परमात्मतत्त्वाठायीच आहेत.



म्हणूनच 'मोक्ष'साधना सामान्य प्रापंचिकाला करता येते. नव्हे तो त्याचा अधिकार व स्वभाव आहे. मुमुक्षुता निर्माण होऊन मुमुक्षु होणे व मोक्ष प्राप्ती होणे या सर्व स्वाभाविक प्रक्रिया आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. म्हणूनच 'पुरुषार्थ' हा 'मानवार्थ' ठरतो आणि 'मोक्ष' हा मानवाचा मूलाधिकार ठरतो!

●●●